मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई

गुरुवार दि.१९ /०७/ २००४ रोजी झालेल्या १०० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची **१००** वी बैठक सोमवार दि.१९/०७/००४ रोजी दुपारी ३.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृह येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

१.	मा.आमदार श्री.सचिन भाऊ अहिर	सभापती
२.	श्री.सुरेश कारंडे	मुख्य अधिकारी
३.	मा.श्री.सचिन मा.सावंत	सदस्य
४.	मा.श्री.विश्वास मोकाशी,	सदस्य
५.	मा. श्री गजेंद्र लष्करी	सदस्य
६.	मा. श्री. रघुनाथ थवई	सदस्य
७.	मा. श्री उस्मान गणी कुरेशी (लालीभाई)	सदस्य
८.	मा. श्री मोहन देसाई	सदस्य
९.	मा.श्री.बाप्पा सावंत	सदस्य
१०.	मा. श्रीमती.छाया कल्याणी	सदस्या
११.	मा.श्री. रमेश परब	सदस्य
१२.	मा. श्री अबुबकर मुसा बाटलीवाला	सदस्य
१३.	कर निर्धारक व संकलक, म.न.पा. यांचे प्रतिनीधी	निमंत्रक

सचिव हयांनी बैठकीच्या सुरुवातीस असे प्रतिपादन केले की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची स्थापना नोव्हेंबर १९९२ मध्ये झाली होती. तत्पूर्वी हे मंडळ मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामध्ये कार्यरत होते. कामे प्रभावीपणे व तत्परतेने राबविण्यासाठी तीन स्वतंत्र मंडळांची स्थापना करण्यात आली होती. त्यापैकी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ हे एक मंडळ असून हया मंडळाची आजची १००वी बैठक संपन्न होत आहे. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची पहिली बैठक दि. ३०.११.९२ रोजी झाली होती. त्यावेळी सन्मा. डॉ. शंकर वामन मटकर हे मंडळाचे सभापती होते. त्यावेळच्या मंडळामध्ये विद्यमान सन्मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हे सध्दा सन्मा.सदस्य म्हणून कार्यरत होते व आजच्या मंडळाच्या १०० व्या बैठकीमध्येही ते सन्मा. सदस्य म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे सन्मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांचे सचिव यांनी सर्वांतर्फे अभिनंदन केले व ते आजच्या बैठकीत शताब्दी सोहळा साजरा करीत असल्याने मा. सभापती यांना अशी विनंती केली की, सन्मा. सदस्यांना स्मृती चिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात यावा.

12 CO/RR 08-04

सभापती
मुं. ई. द. व पु मंडळ
जावक क्र. ५९१
दि. ९/८/०४

मा. सभापती यांनी तदनंतर मंडळाच्या १०० व्या बैठकीच्या निमित्ताने सर्वांचे अभिनंदन करुन असे असे प्रतिपादन केले की, त्यांच्या मागील चार-साडेचार वर्षे सभापती पदावर असताना काही चांगले निर्णय घेण्यात आले आहेत तसेच काही नवीन योजना/दिशा मंडळाला देण्याचा त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. तसेच सन्मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हे मंडळाच्या पहिल्या तसेच १०० व्या बैठकीत उपस्थित असल्याने मा. सभापती यांनी त्यांचे कौतुक केले. राजकीय जीवनामध्ये सामाजिक बांधिलकी ठेऊन कार्य करणारा कार्यकर्ता म्हणून ते ओळखले जातात व हया मंडळामध्ये राहून त्यांनी मुंबईतील रहिवाशांचे प्रंश्न अतिशय चांगल्याप्रकारे सोडवून दाखविले आहेत. गेल्या चार-साडेचार वर्षामध्ये हया मंड्ळाने जे काही चांगले निर्णय घेतले आहेत तसे निर्णय हयापूर्वीच्या मंडळांनी घेतले नव्हते. पुनर्रचनेच्या कामांमध्ये कामांचा दर्जा चांगला ठेवण्याच्यादृष्टीने प्रयत्न करण्यात आले आहेत तसेच पुनर्रचनेच्या कामांना गती देण्याचाही प्रयत्न केला आहे. पुनर्रचित इमारतीमध्ये आता ३' × ४' ऐवजी ४'× ५' च्या ॲल्युमिनियम खिडक्या, गाळयांमधील फरशा चांगल्या प्रकारच्या बसविण्यास मान्यता इ. अनेक चांगले निर्णय आपण हया मंडळाच्या माध्यमातून घेतले आहेत. ओशिवरा, सायन संक्रमण शिबीर तसेच इतर ठिकाणी नवीन संक्रमण शिबीरे बांधण्यात आली आहेत. मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशी त्यांच्या इमारतीतच राहण्याच्या दृष्टीने दुरुस्ती खर्चाची प्रमाणित मर्यादा रु.१०००/- प्रति चौ.मी.वरुन रु.१२००/- प्रति चौ.मी.पर्यंत वाढविण्याबाबत आपल्या मंडळामध्ये ठराव करुन तो प्राधिकरणामडे व शासनाकडे मंजूरीसाठी पाठविला होता व तदनुसार शासनाने विधी मंडळात सदर प्रस्ताव सादर करुन मंजूर करुन घेतला. गेल्या चार-साडेचार वर्षात रहिवाशांची जपणूक कशी करता येईल यादृष्टीने प्रयत्न करण्यात आले. पिंपळवाडीसारखी योजना बंद पडण्याची भिती असताना सदर योजनेच्या कामास गेल्या सप्टेंबरपासून सुरु करण्यात आली व मागील महिन्यातच हया योजनेतील गाळयांच्या चावी वाटपाचा कार्यक्रम करुन ३०० ते ४०० रहिवाशांना त्यांच्या मुळ जागेवरील नवीन घरात पुनर्वसन करण्याचे काम आपल्या मंडळामार्फत करण्यात आले आहे. हया अतिरिक्त मंडळाचे अधिकारी व सन्मा. सदस्य यांचयात मतभेद न करता सामंजस्याने काम करण्यात आले आहे. हया मंडळामार्फत मंडळाच्या कोणत्याही अधिका-यावर निलंबनाची कारवाई करण्यात आलेली नाही. हया मंडळाच्या कार्यकाळामध्ये अनेक मुख्य अधिकारी बदलले. पूर्वी श्रीमती. वंदना खुल्लर, तदनंतर श्री. झेंडे व आता श्री. सुरेश कारंडे हे मुख्य अधिकारी आहेत. हया सर्व अधिका-यांनी अतिशय चांगले सहकार्य हया मंडळास केले आहे. गेल्या चार-साडेचार वर्षांच्या कालावधीमध्ये मुख्य अधिकारी विरुध्द सभापती, सभापती विरुध्द सन्मा. सदस्य किंवा मंडळाचे सदस्य विरुध्द अधिकारी असा संघर्ष केव्हाच झालेला नाही. हयाबाबत मा. सभापतींनी सर्वांचे आभार मानले तसेच अशी अपेक्षा केली की, सद्यः ते सभापती पदावर असून पुढील काळात सर्वांच्या आशिर्वादाने जर सभापती होण्यांची संधी प्राप्त झाल्यास ते ही संधी नक्कीच सोडणार नाहीत. कारण

हया मंडळाच्या माध्यमातून अतिशय चांगल्याप्रकारची कामे करता येतात. राजकारणाचा विचार केल्यास प्रत्येकास मंत्री होण्याची इच्छा असते व तशीच इच्छा त्यांचीही आहे. मात्र मंडळाचा सभापती या नात्याने हया मंडळाने जे चांगले कार्य केले आहे त्याबद्दल त्यांना समाधान आहे. त्यांच्या विधानसभा मतदारसंघात रखडलेल्या पटेल बिल्डिंगच्या पुनर्रचनेच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे तसेच पारशीवाडी या योजनेचे काम पूर्ण करण्यात आले आहे. छत्रीवाला चाळीचे जे रहिवाशी २२ वर्षे संक्रमण शिबीरात रहात होते त्यांना येत्या महिन्या दोन महिन्यात नवीन बांधलेल्या इमारतीत घरे देण्यात येणार आहेत. अनेक इमारतींची दुरुस्ती करण्यात आली असून अनेक इमारतींच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत. १३१ए,बी,सी, खोज़ा चाळ हया रखडलेल्या पुनर्रचना योजनेचेही काम येत्या महिन्याभरात भूमिपूजन समारंभ करुन चालू केले जाणार आहे. अशाप्रकारे सभापती या पदाचा वापर रहिवाशांसाठी चांगले काम करण्याच्यादृष्टीने केला हे दाखवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. सन्मा. सदस्य श्री. रमेश परब यांनी त्यांच्या कारकिर्दीत ते रहात असलेली चाळ पुनर्रचित करुन घेतली आहे व त्यांच्या स्वतःच्याच कारकिर्दीत कदाचित चावी वाटप होईल अशाप्रकारे त्यांनी हाती घेतलले काम पूर्ण करुन दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. हयापुढेही मंडळाचे काम अशाचप्रकारे चालू राहिले पाहिजे. ज्या दृष्टीकोनातून केळकर समितीच्या शिफारशींनुसार १९७२-७४ साली मंडळाची स्थापना करण्यात आली त्यावेळी राजकीय व्यक्तींनी जो दृष्टीकोन ठेवला तो निश्चितच चांगला होता व त्यामुळेच हया मंडळाची स्थापना होऊन आतापर्यंत हया मंडळामार्फत चांगली कामे करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. त्यामुळे आजच्या बैठकीत त्यावेळच्या सर्व संबंधित राजकीय व्यक्तींचे स्मरण करणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे आज सन्मा. सदस्यांना स्मृतीचिन्ह दिले जाणार आहे त्याचप्रमाणे सन्मा. डॉ.शंकर मटकर जे सिध्दीविनायक मंदिराचे ट्रस्टी असून सामाजिक बांधीलकी ठेऊन कार्य करणारे कार्यकर्ते आहेत ते पूर्वी हया मंडळाचे सभापती होते व ते आज सुदैवाने हयात असल्याने त्यांना नंतर बोलावून स्मृती चिन्ह देऊन त्यांचा आदर सत्कार करण्याची अपेक्षा मा. सभंपती यांनी केली. हयामुळे त्यांची मंडळाने आठवण ठेवल्याबद्दल त्यांना आनंद होईल तसेच पुढे जेव्हा कधी मंडळाची १००वी बैठक होईल त्यावेळी सद्यःच्या सभापतींची व सन्मा. सदस्यांची आठवण केली जाईल व हया मंडळाने केलेल्या चांगल्या कामाचेही कौतुक केले जाईल.

मा. सभंपती यांनी तदनंतर सन्मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांचे मनःपूर्वक अभिनंदन करुन असे प्रतिपादन केले की, त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून जनहिताची कार्ये केली असून त्यांच्या अनुभवाचा फायदा हया मंडळाला झालेला आहे. काहीवेळा एखाद्या प्रकरणाची माहिती नसते तेव्हा त्यांच्या मार्गदर्शनामुळे निर्णय घेण्यास मदत झालेली आहे तसेच मंडळाचे अधिकारी व कर्मचारीवर्गाने मंडळाला जे वेळोवेळी सहकार्य केले त्याबद्दल मा. सभापती यांनी त्यांचे तसेच त्यांच्या कार्यालयातील वर्गाचे आभार मानले.

तदनंतर मा. सभापती यांनी म्हाडाचे अध्यक्ष मा. श्री. मधु चव्हाण, मा. मंत्री (गृहनिर्माण) श्री. सय्यद अहदम, मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) श्री. नवाब मलिक, माजी मुख्यमंत्री मा. श्री. विलासरावजी देशमुख व मुख्यमंत्री मा. श्री. सुशिलकुमार शिंदे तसेच त्यांच्या पक्षाचे नेते मा.नामदार श्री. शरद पवारजी, मा. श्री. छगन भुजबळ यांचेही आभार मानले. हया सर्वांमुळेच मंडळावर त्यांची नियुक्ती होऊन चांगले काम करता आले आहे. मा.सभापती यांनी शेवटी सर्वांचे आभार मानून सन्मा. सदस्य व अधिका-यांना मंडळाच्या शतक महोत्सवी बैठकीनिमित्त भेट म्हणून स्मृती चिन्हाचे वाटप केले. तसेच मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांना शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला.

तदनंतर मा. सदस्य व नगरसेवक श्री. मोहन देसाई यांनी असे प्रतिपादन केले की, मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी मंडळामध्ये अतिशय चांगले काम केले असून मंडळाच्या पहिल्या तसेच १००व्या बैठकीचे प्रतिनिधीत्व केले आहे. त्यामुळे मा. सदस्य श्री.मोहन देसाई यांनी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सर्वांतर्फे सत्कार केला. तदनंतर मा. सदस्य श्री.मोहन देसाई यांनी असे प्रतिपादन केले की, आपल्या मंडळाचे सभापती मा. श्री. सचिनभाऊ अहिर यांनी अतिशय उत्कृष्ट काम केले असून कामगारक्षेत्रात कामगारांना ज्या ज्या ठिकाणी शक्य आहे त्या त्याठिकाणी न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. हयाचे बक्षीस म्हणून किंवा त्यांनी केलेल्या कामामुळे त्यांची महाराष्ट्र इंटकच्या अध्यक्ष पदी नेमणूक करण्यात आली आहे. याबद्दल मा. सदस्य श्री.मोहन देसाई यांनी सर्वांतर्फे त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

मा. सदस्य श्री.मोहन देसाई यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, मा. सदस्य श्री.रमेश परब यांचा आज ५१ वा वाढदिवस आहे. त्यामुळे मा. सदस्य श्री.मोहन देसाई यांनी सर्वांतर्फे त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिष्टचिंतन केले.

तदनंतर मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी मंडळाच्या आजच्या १०० व्या बैठकीनिमित्त उपस्थित सन्मा. सदस्य, मा. सभापती व मंडळाचे अधिकारी/कर्मचारी यांना मिठाई वाटली तसेच मा. सदस्य श्री.रमेश परब यांनी त्यांच्या आजच्या ५१ व्या वाढदिवसानिमित्त सभागृहामध्ये मिठाई वाटून सर्वांचे तोंड गोड केले.

तदनंतर मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी सर्वांचे आभार मानून असे प्रतिपादन केले की, मंडळाची जेव्हा पहिली बैठक झाली तेव्हा मा. सुधाकरराव नाईक हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यावेळी एकूण ३० मंडळे तयार करण्यात आली होती. त्यापैकी हया मंडळावर त्यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली होती हे त्यांचे सौभाग्य आहे. तदनंतर तदनंतर मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी मा.श्री. मुरली देवरा, मा. श्री. जावेद खान तसेच सर्व नेत्यांचे आभार मानून असे प्रतिपादन केले की, मा. श्री. जावेद खान यांनी त्यावेळी हया मंडळाची स्थापना करण्याबाबत खूपच मदत केलेली होती. मा. डॉ.श्री. शंकर वामन मटकर हे त्यावेळचे सभापती देखील अतिशय कर्तव्यनिष्ठ होते.

हयाठिकाणी त्यावेळच्या बैठकींना उपस्थित असलेले मंडळाचे बरेचसे अधिकारी आजच्याही बैठकीस उपस्थित आहेत. तदनंतर त्यांच्या पक्षाचे सरकार सत्तेवर नसल्याने काही काळ ते तदनंतरच्या मंडळामध्ये नव्हते. तदनंतर पुन्हा कॉंग्रेस पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यानंतर पुन्हा त्यांची हया मंडळावर सदस्य म्हणून नेमणूक केली गेली हे त्यांचे सौभाग्य आहे. सन १९९२-९३ मध्ये मुंबई शहरामध्ये जेव्हा जातीय दंगली झाल्या होत्या तेव्हा मंडळाच्या अधिका-यांनी अल्पसंख्याकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्यास अतिशय मदत केली होती. श्री. जग्यासी हे त्यावेळी संक्रमण शिबीराचे उपमुख्य अधिकारी म्हणून व श्री. मधुकर पाटील मुख्य अधिकारी म्हणून कार्यरत होते. हया दंगलीच्या काळात सायन संक्रमण शिबीरातील कॅंप नं.३ मधील अल्पसंख्यांक बंधूभगीनींना जोगेश्वरी संक्रमण शिबीरात तात्काळ स्थलांतरित करण्याचे आदेश त्यावेळच्या मा. मुख्यमंत्र्यांनी दिले होते. तदनुषंगाने मंडळाचे वरील अधिकारी, ते स्वतः व डॉ. मटकर व मंडळाच्या इतर अधिका-यांनी दिवसरात्र जागून हया रहिवाशांचे सामान स्वतः उचलून स्थलांतरित करण्यात अनमोल सहकार्य केले होते. त्यावेळी प्रक्षोभक जमाव हया कर्मचा-यांच्या अंगावर धावून येत असतानाही मंडळाच्या कर्मचा-यांनी धाडसाने रहिवाशांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित केले. त्यावेळी मंडळाचे उपमुख्य अभियंता (द) श्री. हडदरे होते जे आज मुख्य अभियंता म्हणून कार्यरत आहेत. तसेच त्यावेळी श्री. झुराणी, श्री. मुलाणी व श्री. अशोक लाल व श्री. जग्यासी हे मंडळाचे अधिकारी होते. हया सर्व अधिका-यांनी त्यावेळी अतिशय चांगले सहकार्य केले होते.

तदनंतर मंडळाच्या १०० व्या बैठकीनिमित्त मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळामधील उपमुख्य अभियंता श्री. वणीकर यांनी आतापर्यंत खूप चांगले काम केले असून येत्या काही दिवसांत त्यांच्यामार्फत आणखी काही चांगली कामे मंडळामध्ये होणार आहेत. त्यांच्या हया चांगल्या कामामुळे पुनर्रचनेच्या कामासाठी भारत सरकारतर्फे निधी दिला जाणार आहे.

हयाबाबत मा. आमदार श्री. मिलिंद देवरा हयांनी केंद्र सरकारकडे आवाज उठविला होता. अर्थमंत्री श्री. चिदंबरमजी व मा. पंतप्रधान श्री. मनमोहन सिंगजी यांनी शहरातील इमारतींच्या पुनर्रचनेसाठी अर्थसंकल्पामध्ये करामध्ये सवलती दिल्याबद्दल मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी त्यांचे आभार मानले. तसेच मा. श्री. शरद पवारजी व मा.श्री. सचिनभाऊ अहिर हयांचे आभार मानून असे प्रतिपादन केले की, मा.सभापती श्री. सचिनभाऊ अहिर यांच्या कालावधीत साडेतीन-चार वर्षांचा कालावधी केव्हा संपला हे कळलेच नाही. ते एक अतिशय चांगले प्रामाणिक सभापती असून त्यांच्याकडे खूप काम असल्याने कामात सतत व्यस्त असतात. ते गेल्या लोकसभा निवडणुकीत दुर्भाग्याने निवडून आले नाहीत. नाहीतर एक चांगला नेता उदयास आला असता . हयामध्ये कदाचित सदस्य म्हणून काही त्रुटी राहिल्या असतील परंतु भविष्यामध्ये श्री. सचिनभाऊ अहिर हे उत्तरोत्तर प्रगती करतील अशी अपेक्षा मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी केली.

तदनंतर मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणून दिले की, मंडळाच्या मागील बैठकीत ते हजर नव्हते. मागील लोकसभा निवडणुकीत भारतीय मतदारांनी कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षांना निवडून दिल्याने मतदारांचे तसेच श्रीमती. सोनिया गांधीजी, श्री. मनमोहन सिंगजी, श्री. शरद पवारजी व इतर सर्व नेत्यांचे आभार मानले. तसेच येत्या विधानसभा निवडणुकीतही कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस विजयी होईल. अशी अपेक्षा मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी व्यक्त यांनी केली.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी तदनंतर महाराष्ट्र शासनाने सदस्यांच्या पुनर्नियुक्तीबाबत जो अध्यादेश निर्गमित केला आहे तो सभागृहात वाचून दाखविण्याची विनंती सचिव यांना केली. तदनुसार सचिव यांनी महाराष्ट्र शासनाचा दि. २५.६.२००४ रोजीचा आदेश क्र. नियुक्ती/२१०४/सीआर ९४/प्र/३ सभागृहास वाचून दाखविला व असे प्रतिपादन केले की, शासनाच्या गृहनिर्माण विभागाने मंडळावर नियुक्त केलेल्या अशासकीय सदस्यांची मुदत दि. २०.४.२००४ पासून संपुष्टात आली होती. महाराष्ट्र शासनाने म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ७ व १८ च्या तरतुदींनुसार हया अशासकीय सदस्यांची संपुष्टात आलेली मुदत दि. २१.०४.२००४ पासून पुढील एक वर्षापर्यंत किंवा शासनाच्या पुढील आदेशापर्यंत हयापैकी जो अगोदरचा कालावधी असेल त्या कालावधीपर्यंत वाढविली आहे.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, शासनाच्या वरील आदेशांनुसार मंडळावरील अशासकीय सदस्यांची दि. २०.४.२००४ पासून संपुष्टात आलेली मुदत दि. २१.४.२००४ पासून वाढविण्यात आली आहे.

मा. सभापती यांनी तदनंतर बैठकीस सुरुवात करण्याच्या सूचना सचिव यांना दिल्या.

---------------------------------×oo×---------------------------------

<u>बाब क्रमांक : १०० / १</u>

विषय- दि. २१.०५. २००४ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या
९९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ७७ वर सादर करण्यात आला आहे.

सदर कार्यवृत्तांताच्या अनुषंगाने मा. सदस्य श्री.सचिन सावंत यांनी असे प्रतिपादन केले की, पृ.क्र.२७ वर ठराव क्र. ९९/८१२ मध्ये असे नमूद केले आहे की, रहिवाशांबरोबरील चर्चेच्या

कार्यवृत्तांतानुसार पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. ~~रहिवाशांबरोबर चर्चा करणे म्हणजे नेमके काय ? अशी विचारणा मा. सदस्य श्री. सचिन सावंत यांनी केली.~~

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ही निविदा उणे दराची असल्याने त्याबाबत रहिवाशांना कल्पना देण्यासाठी चर्चा करण्याचे ठरले होते व रहिवाशांना हयाबाबत कल्पना आहे.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, कार्यवृत्तांतील पृ.क्र.५९ वर नमूद केल्यानुसार निवासी दूरध्वनीचा खर्च दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील अधिका-यांना दिला जात नाही. ही प्रशासकीय बाब आहे परंतु दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील कामांची अत्यावश्यकता लक्षात घेता मंडळातील अधिका-यांना केव्हाही रात्री/अपरात्री संपर्क करावा लागतो. त्यामुळे मंडळातील अधिका-यांना भ्रमण दूरध्वनी सेवा मोफत देणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्या निवासी दूरध्वनीचाही खर्च देण्यात येत नाही. त्यामुळे मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी अशी विनंती केली की, दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील अत्यावश्यक सेवेतील काम करणा-या अभियंता/अधिका-यांना मंडळाच्या खर्चाने भ्रमण दूरध्वनी सेवा उपलब्ध करुन द्यावी.

मुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणास सादर करुन त्यास प्राधिकरणाची मंजूरी घ्यावी लागेल.

मुख्य लेखाधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीत ठरल्यानुसार मंडळाच्या अधिका-यांना निवासी दूरध्वनीचा खर्च देण्याबाबतचा प्रस्ताव तयार केला आहे. भ्रमण दूरध्वनी सेवा कोणत्या अधिका-यास द्यावी हयाबाबत मार्गदर्शक तत्वे आहेत व भ्रमण दूरध्वनीचा खर्च द्यावयाचा झाल्यास त्यास प्राधिकरणाची मंजूरी घ्यावी लागेल. त्यामुळे भ्रमण दूरध्वनीचा खर्च अधिका-यांना देण्याबाबतचा प्रस्ताव तयार करुन तो प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी सादर केला जाईल.

का.अ./ फग-उत्तर विभाग यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या अधिका-यांना पूर्वी पेजर देण्यात आले होते परंतु पेजर कालबाहय झाल्याने आता त्यांचा उपयोग नाही. मात्र मंडळ अद्यापही पेजरचा खर्च संबंधित कंपन्यांना देत आहे. प्रती पेजर रु. २७५/- प्रतीमाह संबंधित कंपन्यांना दिले जात आहेत.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे सुचविले की, पेजर आता कालबाहय झाल्याने त्यांची सेवा त्वरित बंद करावी तसेच एक ठराविक रक्कम अधिका-यांना भ्रमण दूरध्वनीच्या खर्चापोटी देण्यात यावी. सद्यः आपण पेजरसाठी खर्च करीत आहोतच. त्यामुळे पेजरचा खर्च थांबवून भ्रमण दूरध्वनीच्या वापरासाठी ठराविक खर्च मंडळाच्या अधिका-यांना देण्याच प्रस्ताव प्राधिकरणाच्या मंजूरीसाठी पाठविण्याची आवश्यकता वाटत नाही. भ्रमण दूरध्वनीच्या वापराचा ठराविक खर्च मंडळाच्या

अधिका-यांना देण्याबाबतची माहिती प्राधिकरणाच्या माहितीसाठी पाठवावी. हयामध्ये काही तांत्रिक अडचणी असाव्यात असे वाटत नाही.

का.अ./ डी-१ विभाग यांनी आदरपूर्वक असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या अधिका-यांनी ठरविले तर त्यांच्याकडील भ्रमण दूरध्वनी ते कार्यालयीन कामासाठी वापरण्याचे बंद करु शकतात, ज्यामुळे अत्यावश्यक प्रसंगी गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या अधिका-यांनी त्यांच्याकडील भ्रमण दूरध्वनीचा वापर कार्यालयीन कामासाठी करण्याचे बंद केल्यास त्यांना नेहमी कार्यालयात उपस्थित रहावे लागेल.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाची आज शतक महोत्सवी बैठक असल्याने हया बैठकीत मंडळाने चांगले निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यामुळे मंडळाच्या आजच्या १०० व्या बैठकीत मंडळाच्या अधिका-यांना भ्रमण दूरध्वनीचा खर्च देण्याचा निर्णय घेण्यात यावा अशी विनंती मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी केली.

मुख्य लेखाधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या अधिका-यांना भ्रमण दूरध्वनींचा खर्च देण्याबाबत सहमुख्य अधिकारी यांच्याशी चर्चा करुन छाननी केली जाईल व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मा. सदस्य श्री.बाप्पा सावंत यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या अधिका-यांप्रमाणेच उपसभापती यांनाही भ्रमण दूरध्वनीचा खर्च देणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाचे क्षेत्रीय अधिकारी यांना कार्यालयीन कामासाठी बाहेर जावे लागत असल्याने ते ८ किंवा १२ तास कार्यालयात उपस्थित राहू शकत नाहीत. त्यामुळे त्यांना भ्रमण दूरध्वनी वापरणे अनिवार्य आहे. आज बहुतेकांकडे भ्रमण दूरध्वनी आहेत मात्र त्याचा खर्च ते स्वतःच्या पैशाने भागवित आहेत. मंडळामध्ये आज असेही कनिष्ठ अभियंता आहेत ज्यांच्याकडें भ्रमण दूरध्वनी नाहीत. त्यामुळे मंडळाने भ्रमण दूरध्वनीचा खर्च मंडळाच्या अधिका-यांना देणे आवश्यक आहे जेणेकरुन अधिका-यांना वेळोवेळी संपर्क साधणे सर्वांना शक्य होईल.

मुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे सुचविले की, निवासी दूरध्वनीचा खर्च देण्याऐवजी भ्रमण दूरध्वनीचा खर्च देणे योग्य होईल. हयास सर्व अधिकारी तसेच सन्मा. सदस्यांनी सहमती दर्शविली. मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी तदनुषंगाने असे सुचविले की, चांगल्या कंपन्यांचे हँडसेट देण्यात यावेत.

सहमुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हँडसेट अधिका-यांना स्वतः घ्यावा लागेल. भ्रमण दूरध्वनीचे सिमकार्ड मात्र मंडळातर्फे दिले जाईल.

वरील सविस्तर चर्चेअंती मंडळाच्या दि. २१.५.२००४ रोजीच्या ९९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

----------oxoxo----------

उत्तर परिमंडळ

बाब क्रमांक : १०० / २ (अ)

विषय- सन २००४ च्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात घोषित केलेल्या धोकादायक इमारतींची सद्यस्थिती.

सदर माहिती पृ.क्र.७९ ते ८१ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

सदर माहितीची नोंद सर्वानुमते घेण्यात आली.

----------oxxo----------

बाब क्रमांक : १००.२ (ब)

विषय- इ.क्र.३९१ अे, डी, सदगुरु मॅन्शन, मनमाला टँक रोड, माटुंगा या इमारतीच्या दुरुस्तीसाठी प्रशासकीय मंजूरीपेक्षा अधिक असलेल्या खर्चास मंजूरी देण्याबाबत.

....

सदर प्रस्ताव पृ.क्र.८३ ते ८५ वर सादर करण्यात आला आहे.

उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या दुरुस्ती कामाच्या सुधारित अंदाजपत्रकास मंडळाच्या दि. १७.११.२००३ रोजीच्या बैठकीत रक्कम रु.१३१२२४६/- रक्कमेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. सद्यः इमारतीच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून अंतिम देयकानुसार हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी रु.१३३३९६३/- (प्रति चौ.मी. रु. १०२४.५८) प्रत्यक्ष खर्च झालेला आहे जो रु.२१७१७/- ने जास्त आहे. सुधारित प्रमाणित मर्यादा रु. १२००/- प्रति चौ.मी. प्रमाणे एकूण उपलब्ध निधी रु. १५६२३५२/- आहे. वाढीव खर्च रु. २१७१७/- ला मंडळाची मंजूरी आवश्यक आहे. अशाच प्रकारचा इ.क्र.१६५, १३९ए, १३९बी, शेठ मोतीशा लेन हया इमारतीच्या रु. २६,६५६/- वाढीव खर्चास मंजूरी देण्याचा प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयात मंजूरीसाठी सादर केला आहे.

सविस्तर चर्चेअंती वरील दोन्ही इमारतींच्या दुरुस्तीसाठी झालेल्या वाढीव खर्चास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ११०/८१८

इ.क्र.३९१ अे, डी, सदगुरु मॅन्शन, मनमाला टँक रोड, माटुंगा या इमारतीच्या दुरुस्तीसाठी झालेल्या रु. १३,३३,९६३/- (रु.१०२४.५८ प्रति चौ.मी. दराने) खर्चास तसेच इ.क्र.१६५-१३९ए, १३९बी, शेठ मोतीशा लेन हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी झालेल्या रु. ६,३३,३३२/- (रु.९९६.२२ प्रति चौ.मी. दराने) सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

-----------------------------ooXXoo-----------------------------

बाब क्रमांक : १००.२ (क)

विषय- इ.क्र.४३, सी, मोरलँड रोड, सत्तारवाला चाळीच्या दुरुस्तीचा खर्च रु. १०००/- प्रति चौ.मी. वरुन रु. १२००/- प्रति चौ.मी. प्रमाणे करण्यास मंजूरी देण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.८७ वर सादर करण्यात आला आहे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, दुरुस्ती खर्चाची प्रमाणित मर्यादा आता रु. १०००/- प्रति चौ.मी.वरुन रु. १२००/- प्रति चौ.मी.पर्यंत वाढविण्यात आली असल्याने हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी रु. १२००/- प्रति चौ.मी.दराने खर्च करण्यास हरकत नाही. एकाच इमारतीच्या दुरुस्तीचा असा प्रस्ताव सादर करण्याऐवजी अशा अनेक इमारती असतील ज्यांच्या दुरुस्तीचा खर्च रु. १२००/- प्रति चौ.मी. पर्यंत होत असेल. त्यामुळे मा. सभापती यांनी विचारणा केली की, अन्य इमारतींबाबतचे असे प्रस्ताव मंडळाच्या मंजूरीसाठी का सादर केले नाहीत ?

उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या आजच्या बैठकीमध्ये रु. १२००/- प्रति चौ.मी.दराप्रमाणे अनेक अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. हया इमारतीच्या अंदाजपत्रकास मंडळाच्या दि. २३.६.९९ रोजीच्या बैठकीत रु. १२५९.२५/- प्रति चौ.मी.दराने प्रशासकीय मंजूरी दिलेली होती. मात्र त्यावेळी दुरुस्ती खर्चाची प्रमाणित मर्यादा रु. १०००/- प्रति चौ.मी.होती. परंतु आता दुरुस्ती खर्चाची प्रमाणित मर्यादा रु. १२००/- प्रति चौ.मी.पर्यंत वाढविली असल्याने त्यानुसार खर्च करण्यासाठी मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, ज्या धोकादायक इमारती घोषित केल्या आहेत व ज्यांच्या अंदाजपत्रकांना रु. १०००/- प्रति चौ.मी.पेक्षा अधिक दराने प्रशासकीय मंजूरी प्रदान केली आहे अशा इमारतींनाही आपण रु. १२००/- प्रति चौ.मी.पर्यंत खर्च करण्यास परवानगी देणार आहोत का ?

उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ज्या इमारतींच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना रु. १०००/- प्रति चौ.मी.पेक्षा अधिक दराने प्रशासकीय मंजूरी प्रदान केली असेल अशा इमारतींच्या दुरुस्तीची कामे अद्याप पूर्ण झाली नसल्यास, आवश्यकतेनुसार अशा इमारतींच्या दुरुस्तीचा खर्च वाढीव प्रमाणित मर्यादा रु. १२००/- प्रति चौ.मी. प्रमाणे करण्यास मंडळाची मंजूरी घेण्यात येईल. अशाच प्रकारचे प्रस्ताव इ.क्र.८, व्हीक्टोरिया स्ट्रीट, तिसरी क्रॉस लेन, ई. विभाग, इ.क्र.४, कामाठीपूरा, १२वी गल्ली, इ.विभाग व इ.क्र.११२, कामाठीपूरा, ५वी गल्ली, ई.विभाग हया तीन इमारतींबाबत आयत्यावेळच्या विषयात मा. अध्यक्षांच्या परवानगीने मंजूरीसाठी सादर केले आहेत.

वरील सविस्तर चर्चेअंती हया ४ इमारतींच्या दुरुस्तीचा खर्च वाढीव प्रमाणित मर्यादा रु. १२००/- प्रति चौ.मी. प्रमाणे करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : १००/८१९

खालील ४ इमारतींच्या दुरुस्तीचा खर्च वाढीव प्रमाणित मर्यादा रु.१२००/- प्रति चौ.मी. प्रमाणे करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१) इ.क्र.४३,सी, मोरलँड रोड, इ. विभाग,

२) इ.क्र.८, व्हीक्टोरिया स्ट्रीट, तिसरी क्रॉस लेन, इ. विभाग,

३) इ.क्र.४, कामाठीपूरा, १२वी गल्ली, इ.विभाग

४) इ.क्र.११२, कामाठीपूरा, ५वी गल्ली, ई.विभाग

-----------xoxox-----------

बाब क्रमांक : १००.२ (ड)

विषय- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.८९ ते ३०५ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील ई. विभागातील ३०, फ्ग/द विभागातील १८ व फ्ग/ऊ विभागातील २० अशा एकूण ६८ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. हयाशिवाय मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयात उत्तर

परिमंडळातील ई. विभागातील ११, फग/द विभागातील ६ व फग/ऊ विभागातील ४ अशा एकूण २१ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती उत्तर मंडळातील एकूण ८९ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : १००/८२०

उत्तर परिमंडळातील एकूण ८९ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ / सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

----------------xxxx---------------

दक्षिण परिमंडळ

बाब क्रमांक : १००.३ (अ)

विषय- नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या संदेशाची माहिती.
(कालावधी दि. १८.०५.२००४ ते २५.०६.२००४)

सदर माहिती पृ.क्र.३०७ ते ३१३ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

सदर माहितीची नोंद सर्वांनी घेतली.

--------------------------०००००००--------------------------

बाब क्रमांक : १००.३ (ब)

विषय- सन २००४ च्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात घोषित केलेल्या धोकादायक इमारतींची सद्यस्थिती.

सदर माहिती पृ.क्र.३१५ ते ३१७ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

सदर माहितीची नोंद सर्वानुमते घेण्यात आली.

--------------------०xx०--------------------

बाब क्रमांक : १००.३ (क)

विषय- दक्षिण परिमंडळातील सी ३-४ विभागातील धोकादायक मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींना टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

....

सदर प्रस्ताव पृ.क्र.३१९ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, सी ३-४ विभाग यांनी असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील सी३-४ विभागातील उपकरप्राप्त इमारतींना टेकू लावण्याच्या कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेचा कालावधी दि. १७.७.२००४ पर्यंत आहे. त्यामुळे दि. १८.७.२००४ ते १७.७.२००५ हया कालावधीसाठी टेकू लावण्याच्या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून त्यानुसार हया कालावधीसाठी रु. ४,५९,७३०/- खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास मंडळाची प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर कामास प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : १००/८२१

दक्षिण परिमंडळातील सी३-४ विभागातील धोकादायक मोडकळीस आलेल्या इमारतींना उपकरप्राप्त इमारतींना दि. १८.७.२००४ ते १७.७.२००५ हया कालावधीसाठी टेकू लावण्याच्या कामाच्या रु. ४,५९,७३०/- खर्चाच्या अंदाजपत्रकास मंडळाची प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

--------------------------------------oo-----------------------------

बाब क्रमांक : १००.३ (ड)

विषय- इ.क्र.२०-३०, किचन गार्डन लेन या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

....

सदर प्रस्ताव पृ.क्र.३२१ ते ३२३ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, सी ३-४ विभाग यांनी असे प्रतिपादन केले की, इ.क्र.१२-१४, २०-३० व ३६-४० हया तीन इमारती वेगवेगळया उपकराखाली उपकरप्राप्त आहेत. या तिन्ही इमारतींची पूर्वी एकत्रितपणे दुरुस्ती करण्यात आलेली आहे. इ.क्र.२०-३०, किचन गार्डन

लेन हया इमारतीची पाहणी केली असता सदर इमारतीस तात्काळ दुरुस्तीची आवश्यकता आहे. त्यामुळे आता ही इमारत स्वतंत्रपणे दुरुस्तीसाठी हाती घेण्यात आली असून चौथ्या टप्प्याच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकानुसार रु. १५४४९४८/- (रु. ९९७.९५ प्रति चौ.मी.) खर्च अपेक्षित असून त्यास मंडळाची प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर इमारतीच्या चौथ्या टप्प्याच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : १००/८२२

प्रशासकीय मंजूरी

इ.क्र.२०-३०, किचन गार्डन लेन हया इमारतीच्या चौथ्या टप्प्याच्या रु. १५,४४,९४८/- (रु. ९९७.९५ प्रति चौ.मी.) खर्चाच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

-----------------------------0000--------------------

बाब क्रमांक : १००.३ (इ)

विषय- दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.३२५ ते ५९१ वर सादर करण्यात आले आहेत.

हया प्रस्तावांमध्ये दक्षिण परिमंडळातील अ. विभागातील ४, ब. विभागातील १२, सी १-२ विभागातील २८, सी ३-४ विभागातील २०, डी-१ विभागातील २३ व डी-२ विभागातील १४ अशा एकूण १०१ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. हयाशिवाय मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयात दक्षिण परिमंडळातील एकूण १५ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील एकूण ११६ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : १००/८२३

दक्षिण परिमंडळातील एकूण ११६ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

-----------०००-----------

पुनर्रचना विभाग

बाब क्रमांक : १००.४

विषय- इ.क्र.८,रतनजी पालनजी चाळ, भूकर क्र. ५/७१३, माझगाव विभाग, मुंबई हया इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस सुधारित प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.५९३ ते ५९९ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र) यांनी असे प्रतिपादन केले की, हया पुनर्बांधणी योजनेच्या रु. २,६९,२२,१८६/- खर्चास (रु.५४०० प्रति चौ.मी.) दि. ३०.७.९७ रोजी प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली असून सध्या इमारतीच्या पुनर्रचनेचे काम नुक्तेच सुरु करण्यात आले आहे. कार्यकारी अभियंता (पु.वि.२) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सद्यःचा या योजनेच्या पुनर्बांधणीचा दर रु. ८३१२.१५ प्रति चौ.मी. येत असून त्यानुसार या योजनेवर रु.४,६२,२१,५८५/- खर्च येणार आहे ज्यास मंडळाची सुधारित प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, मुळ व सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेमध्ये एवढा फरक का पडला आहे. तदानुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र) यांनी असे प्रतिपादन केले की, मुळ प्रशासकीय मान्यता ही सन १९९६ च्या प्रचलित दरानुसार तयार केलेल्या ढोबळ अंदाजपत्रकानुसार आहे. मात्र हया इमारतीचे सविस्तर अंदाजपत्रक तयार केल्यानंतर निविदा रक्कम रु. ३.७१ कोटी आहे. हयामध्ये सध्याच्या प्रचलित पध्दतीनुसार स्वयंपाकाचा ग्रनाईटचा ओटा, ॲल्युमिनियम खिडक्या, जिन्याला कडाप्पा लाद्या, स्पार्टेक्स टाईल्स हया बाबी आता नव्याने समाविष्ट करावयाच्या असल्याने पुनर्बांधणी योनजेच्या प्रत्यक्ष खर्चात वाढ होत आहे. प्रत्ये पुनर्बांधणी योजनेला ढोबळ अंदाजपत्रकानुसार प्रशासकीय मंजूरी घेतली जात व तदनंतर सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन सुधारित प्रशासकीय मंजूरी घ्यावी लागते.

वरील सविस्तर चर्चेअंती सदर पुनर्बांधणी योजनेस सुधारित प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : १००/८२४ ,
[illegible]

इ.क्र.८,रतनजी पालनजी चाळ, भूकर क्र. ५/७१३, माझगाव विभाग, मुंबई हया इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेच्या रु.४,६२,२१,५८५/- एवढया खर्चास सुधारित प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

-----oxoxoxoxo-----

<u>सहकारी संस्था कक्ष</u>

<u>बाब क्रमांक : १००.४ (अ)</u>

विषय- म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३ (बी) नुसार नियोजित सह.गृह.नि. संस्थांचे मालकी हक्क हस्तांतरणाचे प्रस्ताव भू-संपादनाच्या मंजूरीसाठी शासनाकडे सादर करण्यास मंजूरी देण्याबाबत.

१) दागिनावाला मॅन्शन, ५७८७१सी, १सरडी,५७८४,१-डी, १सीए, एम.एम.छोटानी मार्ग, माहिम मुंबई-१६ येथील भूखंड व त्यावरील नियोजित दागिनावाला मॅन्शन स.गृ.नि.संस्था (नि.),

२) छत्रभुज राघवजी बिल्डिंग, ९/११/१३, भास्कर लेन, भुलेश्वर, मुंबई-०२ येथील भूखंड व त्यावरील नियोजित श्री समुख स.गृ.नि.संस्था (नि.),

३) ६१,बी.ए.वीराणी मार्ग, मस्तान तालाब, नागपाडा, मुंबई-०८ येथील भूखंड व त्यावरील नियोजित हुजैरिया स्टीट स.गृ.नि.संस्था (नि.),

४) २८/३, दया मंझील, बी.जे.देवरुखकर रोड, सेस क्र.१५/६२, नायगांव, दादर, मुंबई-१४ येथील भूखंड व त्यावरील नियोजित सिध्दी सहकारी स.गृ.नि.संस्था (नि.),

५) इमारत १५/४, उरणकर वाडी, तात्यासाहेब घारपूरे पथ येथील भूखंड व त्यावरील नियोजित सिध्दी सहकारी स.गृ.नि.संस्थेकरिता कलम १०३ (ब) अन्वये भूसंपादन करण्याच्या प्रस्तावास विशेष भूसंपादन अधिकारी यांनी आपले स्तरावर नामंजूर केलेल्या निर्णयावर फेरविचार करण्यासाठी शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळण्याबाबत.

सदर प्रस्ताव पूरवणी कार्यसूचीतील पृ.क्र.१ ते ५१ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने श्री. महिशी, उप अभियंता हयांनी असे प्रतिपादन केले की, अ.क्र.१ वर नमूद केलेल्या दागिनावाला मॅन्शन बाबत मालमत्ताधारक श्री.अख्तर हसन रिझवी यांनी अशी तक्रार केली आहे की, हया इमारतीच्या पुनर्विकासासाठी त्यांना ४० टक्के रहिवाशांनी संमतीपत्रे

दिली आहेत. अशा परिस्थितीत कलम १०३ (ब) नुसार सादर केलेल्या प्रस्तावास ७० टक्के रहिवाशांची संमती असण्याचा प्रश्न उद्‌दवत नाही.त्यामुळे हयाची छाननी करण्यी विनंती त्यांनी केली आहे.

मा. सभापती व सन्मा. सदस्यांनी तदनुषंगाने हया प्रस्तावाच्या अनुषंगाने असे सुचविले की, तक्रारदार श्री.अख्तर हसन रिझवी यांच्या तक्रारीची छाननी करुन नंतर हा प्रस्ताव मंडळाच्या पुढील बैठकीमध्ये फेर सादर करावा. हयास सर्वानुमते सहमती दर्शविण्यात आली.

तदनंतर श्री. महिशी, उप अभियंता हयांनी असे प्रतिपादन केले की, उर्वरित ४ प्रस्तावांमध्ये ७० टक्के रहिवाशांची संमती आहे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने अशा सूचना दिल्या की, अ.क्र.३ वरील इमारत ही मा. मंत्री (गृ.नि.) यांच्या विधानसभा मतदारसंघातील असल्याने सदर प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यापूर्वी प्रस्ताव योग्य असल्याची खातरजमा करावी तसेच मागे सांगितल्याप्रमाणे हया प्रस्तावांतर्गत इमारतीतील रहिवाशांना स्पष्ट कल्पना देण्यात यावी की, त्यांचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर त्यांच्या इमारतीची दुरुस्तीची वा पुनर्रचनेची जबाबदारी सर्वस्वी त्यांची राहील. हयाबाबत रहिवाशांना आपण जी कल्पना देतो त्याबाबतची माहिती पुढील बैठकीत सादर करावी.

वरील सविस्तर चर्चेअंती अ.क्र.२ ते ५ वरील प्रस्ताव भूसंपादनाच्या मंजूरीसाठी शासनाकडे सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : १००/८२४

म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३ (बी) नुसार नियोजित सह.गृह.नि. संस्थांचे मालकी हक्क हस्तांतरणाचे खालील ४ प्रस्ताव भूसंपादनाच्या मंजूरीसाठी शासनाकडे सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१) छत्रभुज राघवजी बिल्डिंग, ९/११/१३, भास्कर लेन, भुलेश्वर, मुंबई-०२ येथील नियोजित श्री समुख स.गृ.नि.संस्था (नि.),

२) ६१,बी.ए.वीराणी मार्ग, मस्तान तालाब, नागपाडा, मुंबई-०८ येथील नियोजित हुजैरिया स्टीट स.गृ.नि.संस्था (नि.),

३) २८/३, दया मंझील, बी.जे.देवरुखकर रोड, सेस क्र.१५/६२, नायगांव, दादर, मुंबई-१४ येथील नियोजित सिध्दी सहकारी स.गृ.नि.संस्था (नि.),

४) इमारत १५/४, उरणकर वाडी, तात्यासाहेब घारपूरे पथ येथील नियोजित सिध्दी सहकारी स.गृ.नि.संस्थेकरिता कलम १०३ (ब) अन्वये भूसंपादन करण्याच्या प्रस्तावास विशेष भूसंपादन अधिकारी यांनी आपले स्तरावर नामंजूर केलेल्या निर्णयावर फेरविचार करण्यासाठी शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळण्याबाबत.

----------oooo----------

बाब क्रमांक : १००.५

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी ठेवावयाचे विषय

१) विषय- म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) नुसार प्रमाणपत्र जारी करण्याचे प्रस्ताव.

---

१) व्यंकटेश प्रसाद नावाने ओळखल्या जाणा-या प्लॉट नं.५७८, टी.पी.एस.नं.१०७८, सोनावाला अग्यारी लेन, मोरी रोड, माहीम, मुंबई-०१६.

२) इ.क्र.१४७-१४९,झुबेदा मंझील, वीर सावरकर मार्ग, माहीम या इमारतीला रद्द करण्यात आलेले ८८ (३) (अ) प्रमाणपत्र पुन्हा जारी करण्याबाबत.

....

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयात पटलावर सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती वरील दोन्ही इमारतींना म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) नुसार प्रमाणपत्र जारी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : १००/८२५

म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) नुसार खालील दोन इमारतींना प्रमाणपत्र जारी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१) व्यंकटेश प्रसाद नावाने ओळखल्या जाणा-या प्लॉट नं.५७८, टी.पी.एस.नं.१०७८, सोनावाला अग्यारी लेन, मोरी रोड, माहीम, मुंबई-०१६.

२) इ.क्र.१४७-१४९,झुबेदा मंझील, वीर सावरकर मार्ग, माहीम, या इमारतीला रद्द करण्यात आलेले ८८ (३) (अ) प्रमाणपत्र पुन्हा जारी करण्याबाबत.

--ooooo-----------------------------------

२) विषय- उत्तर व दक्षिण परिमंडळातील संरचनात्मक दुरुस्ती कामांसाठी दहा टक्क्यापेक्षा अधिक दराने प्राप्त झालेल्या निविदांचे देकार वाटाघाटीने निश्चित करणे व निविदा स्विकारण्यास मंडळाची मान्यता मिळणेबाबत.

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयात पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) व उपमुख्य अभियंता (दक्षिण) यांनी तदानुषंगाने असे प्रतिपादन केले की, प्रस्तावांतर्गत उत्तर परिमंडळातील १४ व दक्षिण परिमंडळातील

१५ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या ज्या निविदा हया मुख्य अभियंता / प्राधिकरण यांच्या स्तरावर स्विकृत करावयाच्या होत्या. हया निविदांच्या अनुषंगाने मुख्य अभियंता / प्राधिकरण यांनी असे आदेश दिले आहेत की, निम्नतम निविदाधारकाशी वाटाघाटी कराव्यात. प्राधिकरणाच्या दि. २६.११.२००२ रोजीच्या ठराव क्र. ५८६० नुसार निविदा वाटाघाटी करुन स्विकृत करावयाच्या असतील तर त्यास मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, उपाध्यक्ष व मु.का.अ./प्राधिकरण यांनी पूर्वी असे आदेश दिले आहेत की, निविदाधारकाशी वाटाघाटी न करता निविदा मंजूर किंवा नामंजूर कराव्यात. उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी तदानुषंगाने असे प्रतिपादन केले की, उपाध्यक्ष व मु.का.अ./प्राधिकरण यांच्या वरील आदेशांनंतर प्राधिकरणाने दि. २६.११.२००२ रोजीच्या ठरावानुसार वाटाघाटी करण्याचे आदेश दिले आहेत मात्र वाटाघाटी केल्यानंतर निविदा ज्या अधिका-याच्या अधिकारात येते त्या अधिका-याच्या वरिष्ठ पातळीवर स्विकृत/मंजूर/नामंजूर करण्याचे अधिकार दिले आहेत. त्यानुसार हया निविदा मंडळापुढे मंजूरीसाठी सादर केल्या आहेत.

मा. सभापती यांनी विचारल्यानुसार प्रभारी उपमुख्य अभियंता (दक्षिण) यांनी असे प्रतिपादन केले की, प्राधिकरणाने दि. २६.११.२००२ रोजी पारीत केलेल्या ठराव क्र.५८६० नुसार वाटाघाटी केल्यानंतर निविदा स्विकृत / मंजूर /नामंजूर करण्याचे अधिकार निविदा ज्या अधिका-या अधिकारात येते त्याच्या वरिष्ठ पातळीवरील अधिका-यांना/विभागीय मंडळांना आहेत.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने अशा सूचना दिल्या की, हयाबाबत सहमुख्य अधिकारी यांनी छाननी करुन निविदा स्विकृत करण्यास मंजूरी द्यावी. उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी तदानुषंगाने अशी विनंती केली की, छाननी वरिष्ठ अधिका-यांनी करणे आवश्यक असल्याने सहमुख्य अधिकारी यांना छाननी करण्यास न सांगता मुख्य अधिकारी हयांना छाननी करण्यास सांगावे. प्रभारी उपमुख्य अभियंता (द.) यांनी तदानुषंगाने असे प्रतिपादन केले की, ही तांत्रिक बाब आहे. मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे आदेश दिले की, मुख्य अधिकारी यांनी सहमुख्य अधिकारी यांना बोलावून सदर निविदांची छाननी करुन त्या मंजूर कराव्यात. हयास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : १००/८२६

उत्तर परिमंडळातील सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'क' व 'ड' नुसार उत्तर परिमंडळातील १४ व दक्षिण परिमंडळातील १५ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या निविदांची छाननी मुख्य अधिकारी यांनी सहमुख्य अधिकारी यांच्या उपस्थितीत करुन त्या मंजूर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---oOXXOo---

३) विषय- इ.क्र.१४७-१४९, डिमिटिमकर रोड, नागपाडा हया इमारतीला म्हाड अधिनियमाच्या कलम ८८ (३)(अ) नुसार जारी करण्यात आलेले प्रमाणपत्र रद्द करणेबाबत.

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयात पटलावर सादर करण्यात आला आहे.

उपमुख्य अभियंता (उ.) यांनी तदानुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या रहिवाशांना इमारतीच्या दुरुस्तीसाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. ही इमारत पुनर्रचनेसाठी घेण्यात आली होती परंतु रहिवाशांनी इमारतीची दुरुस्ती ना.ह.प्र.पत्रांतर्गत करण्याचे ठरविले असल्याने हया इमारतीची पुनर्बांधणी योजना थांबविली आहे.

सविस्तर चर्चेअंती हया इमारतीस जारी करण्यात आलेले ८८ (३)(अ) प्रमाणपत्र रद्द करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : १००/८२७ [illegible]

इ.क्र.१४७-१४९, डिमिटिमकर रोड, नागपाडा, मुंबई हया इमारतीला म्हाड अधिनियमाच्या कलम ८८ (३)(अ) नुसार जारी करण्यात आलेले प्रमाणपत्र रद्द करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

----------------------oo□□oo---------------

४) विषय- ३१ यू, बदामी बोहरी चाळ, गॅस कंपनी लेन, लालबाग, मुंबई-१२ हया इमारतीतील पाच भाडेकरु / रहिवाशांच्या नावात बदल करणेबाबत.

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयात पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उ.) यांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीत एकूण ८८ भाडेकरु/रहिवाशी असून सदर इमारतीला म्हाड अधिनियमाच्या कलम ८८ (३)(अ) नुसार प्रमाणपत्र जारी केलेले आहे. इमारत धोकादायक स्थितीत असून भाडेकरु/रहिवाशांना जागा खाली करण्याच्या सूचना देणे आवश्यक असून ८३ भाडेकरु/रहिवाशांनी जागा खाली करण्याच्या सूचना स्विकारल्या आहेत. इमारतीला ८८ (३) (अ) प्रमाणपत्र जारी केल्यानंतर ५ भाडेकरु/रहिवाशांनी त्यांच्या जागा विकल्या आहेत व त्यांच्या जागी ५ नवीन भाडेकरु/रहिवाशी आले आहेत. जागा खाली करण्याच्या सूचना जून्या भाडेकरु/रहिवाशांच्या नांवे दिल्या असल्याने नवीन ५

भाडेकरु/रहिवाशी जागा खाली करण्याच्या सूचना त्यांच्या नांवे देण्याची विनंती करीत आहेत. तसेच ते जून्या भाडेकरु/रहिवाशांच्या नावाने जागा खाली करण्याच्या सूचना स्विकारण्यास तयार नाहीत. भाडेकरुंच्या नावाच्या बदलास मंडळाची मंजूरी आवश्यक असल्याने प्रस्ताव मंडळापुढे मंजूरीसाठी सादर केला आहे.

मा. सभापती व मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी यांनी तदनुषंगाने असे सुचविले की, भविष्यात न्यायालयीन प्रकरणे उदभवू नयेत हयाची काळजी घेऊन व नवीन भाडेकरु/रहिवाशांच्या कागदपत्रांची छाननी करुन भाडेकरु/रहिवाशांच्या नावाच्या बदलास मंजूरी द्यावी.

उपमुख्य अभियंता (उ.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, नवीन भाडेकरु/रहिवाशांनी कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. त्यांच्या नावाच्या भाडेपावत्या सादर केल्या आहेत व रहिवाशी म्हणून त्यांची नावे आपल्याला टाकावीच लागतील.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, भाडे पावतीच्या आधारे भाडेकरु/रहिवाशी हक्क सांगतीलच असे नाही. रहिवाशी म्हणून नवीन भाडेकरु/रहिवाशांची नावे टाकण्यास हरकत नाही. मात्र भाडेकरु/रहिवाशांच्या नावात बदल करणे योग्य होणार नाही.

सहमुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, इमारतीला जर ८८ (३)(अ) प्रमाणपत्र जारी केले नसते तर नवीनच भाडेकरु/रहिवाशांची नावे रहिवाशांच्या यादीत समाविष्ट केली गेली असती. मात्र इमारतीला जर ८८ (३)(अ) प्रमाणपत्र जारी केले असल्याने व ५ भाडेकरु/रहिवाशांच्या नावात बदल झाला असल्याने त्यास मंडळाची मंजूरी आवश्यक आहे. हया ५ नवीन भाडेकरु/रहिवाशांनी कागदपत्रांची पूर्तता केली असल्याने त्यांच्या नावाच्या बदलास मंजूरी देण्यास हरकत नसावी.

मा. सभापती यांनी सांगितल्यानुसार प्रभारी का.अ./ फग-द विभाग यांनी ५ जून्या व नवीन भाडेकरु/रहिवाशांची यादी वाचून दाखविली.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया ५ नवीन भाडेकरु/रहिवाशांच्या बदलास मंजूरी देण्यास हरकत नाही. मात्र ८८ (३)(अ) प्रमाणपत्र जारी केल्यानंतर नवीन भाडेकरु/रहिवाशांच्या नावे भाडे पावती दिली जाऊ शकत नाही. हयामुळे त्यांनी अशी विचारणा केली की, हया ५ नवीन भाडेकरु/रहिवाशांच्या बदलास मंजूरी दिली तर हयासारख्याच अन्य प्रकरणांमध्ये आपण मंजूरी देऊ शकतो का ? ८८ (३)(अ) प्रमाणपत्र जारी केल्यानंतर आपण पुनर्बांधणीसाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरु करतो.

उपमुख्य अभियंता (उ.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ही जागा मंडळाने संपादित केली नसल्याने इमारत मालक भाडेकरु/रहिवाशी बदलू शकतो. ही जागा शहर विकास आराखडयात आरक्षित असल्याने हया इमारतीची पुनर्बांधणी होणार नाही.

मा. सभापती व मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, भाडेकरु म्हणून गाळा ज्याच्या मालकीचा आहे त्याचे व रहिवाशी म्हणून सद्यः राहणा-या रहिवाशांचे नाव जागा खाली करण्याच्या सूचनेमध्ये टाकले जाते. हयामुळे नवीन रहिवाशांची नावे रहिवाशी म्हणून जागा खाली करण्याच्या सूचनेमध्ये टाकण्यास हरकत नाही.

सहमुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया प्रकरणात गाळा पूर्वी ज्याच्या मालकीचा होता त्याच्या मालकीमध्येच बदल झाला आहे. रहिवाशांच्या नावात बदल झाला असता तर त्यासाठी मंडळापुढे येण्याची गरजच भासली नसती. भाडेकरु हक्कामध्येच बदल झाला असल्याने त्यास मंडळाची मंजूरी आवश्यक आहे. हयामध्ये मा. सभापती यांनी विचारणा केल्यानुसार ८८ (३)(अ) प्रमाणपत्र जारी केल्यानंतर भाडेकरु हक्काच्या बदलाची सर्व प्रकरणे मंडळापुढे मंजूरीसाठी सादर केली जातील का ?

का.अ./ फग-उ विभाग व का.अ./ फग-द विभाग यांनी असे प्रतिपादन केले की, भाडेकरु हक्कामध्ये जर बदल झाला असेल व जागा खाली करण्याची सूचना देतेवेळी जर संबंधित नवीन भाडेकरुने जर त्याच्या नावे जागा खाली करण्याची सूचना देण्याची विनंती केल्यास अशी प्रकरणे मंडळापुढे मंजूरीसाठी सादर करावीच लागतील.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, आपण जेव्हा इमारती पुनर्रचित करतो तेव्हा नवीन गाळयाचे देकारपत्र देताना शुल्क आकारुन भाडेकरु हक्क हस्तांतरणास परवानगी देतो. मात्र तत्पूर्वी अशी परवानगी देत नाही. त्यामुळे इमारतीला ८८ (३) (अ) प्रमाणपत्र जारी केल्यानंतर भाडेकरु हक्क बदलास आपण परवानगी देऊ शकतो का ? अशी विचारणा मा. सभापती यांनी केली. ज्याप्रमाणे आपण सद्यः राहणा-या रहिवाशाचे नाव रहिवाशी म्हणून जागा खाली करण्याच्या सूचनेमध्ये नमूद करतो त्याचप्रमाणे हया ५ नवीन भाडेकरु/रहिवाशांची नावे रहिवाशी म्हणून जागा खाली करण्याच्या सूचनेमध्ये नमूद करावीत. भविष्यात नवीन गाळा देतेवेळी शुल्क आकारुन भाडेकरु हक्क हस्तांतरणास परवानगी द्यावी.

उपमुख्य अभियंता (उ.) यांनी मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी विचारणा केल्यानुसार असे प्रतिपादन केले की, ही इमारत धोकादायक असून रिकामी करुन घेणे आवश्यक आहे. मात्र हे ५ रहिवाशी त्यांची नावे व्हेकेशन नोटीसमध्ये नसल्याने व्हेकेशन नोटीस स्विकारण्यास व जागा खाली करण्यास तयार नाहीत.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया ५ नवीन रहिवाशांची नावे व्हेकेशन नोटीसमध्ये टाकावीत व तदनंतरही ते जर जागा खाली करण्यास तयार नसतील तर पोलीस बळाचा वापर करुन जागा खाली करुन घ्याव्यात. इमारतीला ८८ (३) (अ) प्रमाणपत्र जारी केल्यानंतर

जर इमारत खाजगी विकासकाने पुनर्रचित केली तर आपण भाडेकरु/रहिवाशी हक्काच्या बदलास परवानगी देत नाही. अशा प्रकरणांमध्ये आपण १३.६.१९९६ पूर्वीची कागदपत्रे तपासतो.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.)व सचिव यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, अशा प्रकरणांत आपण अपरिवर्तनीय संमतीपत्रे रहिवाशांकडून घेतले जाते. तसेच अशा प्रकरणांत जरी दि.१३.६.९६ पूर्वीच्या कागदपत्रांनुसार भाडेकरु/रहिवाशी हक्क ठरविले जातात. मात्र दि.१३.६.९६ नंतर भाडेकरु/रहिवाशाच्या नावात बदल झाला असल्यास अशा बदलास मंजूरी देण्याचे शासनाचे आदेश आहेत. मात्र दि.१३.६.९६ रोजी भाडेकरु/रहिवाशांची जी संख्या असेल त्यामध्ये वाढ करता येत नाही.

सहमुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया प्रकरणांत गाळयाचे मालकी हक्क इमारत मालकाने बदलले आहेत. त्यामुळे हया नवीन ५ भाडेकरुंना रहिवाशी न म्हणता गाळयाचे मालक / भाडेकरु म्हणूनच संबोधने आवश्यक आहे. त्यामुळे हया बदलास मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, हया इमारतीतील ज्या रहिवाशांना व्हेकेशन नोटीसा दिल्या आहेत त्यांनी जागा खाली केल्या आहेत का ? तदनुषंगाने का.अ./फग-द विभाग यांनी असे प्रतिपादन केले की, हे सर्व रहिवाशी एकत्रिपणे जागा खाली करणार आहेत. मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, इमारत धोकादायक असताना रहिवाशांच्या जागा त्वरित खाली करुन घ्याव्या लागतील अन्यथा भविष्यात काही दुर्घटना झाल्यास गंभीर परिस्थिती निर्माण होईल.

उपमुख्य अभियंता, (पुनर्रचना) यांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीला ८८ (३) (अ) प्रमाणपत्र जारी केले असून भूसंपादनाची कार्यवाही केलेली नाही. आता ही इमारत धोकादायक स्थितीत असल्याने त्वरित रिकामी करुन घेणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत भाडेकरुंनी ते हया इमारतीतील भाडेकरु असल्याने त्यांचया नावे व्हेकेशन नोटस देण्याची विनंती केल्यास त्याबाबत कोणता निर्णय घ्यावा हा मुद्दा आहे. भाडे पावती हीच त्यांच्या नावाची असल्याने त्यांना भाडेकरु म्हणूनच व्हेकेशन नोटीस द्यावी लागेल.

मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, पूर्वी आपण अशा प्रकरणात रहिवाशी म्हणून व्हेकेशन नोटीस दिलेल्या आहेत. हया प्रकरणात संबंधित भाडेकरुंनी रहिवाशी म्हणून व्हेकेशन नोटीस स्विकारली असती तर हे प्रकरण मंडळापुढे आले नसते. संबंधित भाडेकरु रहिवाशी म्हणून व्हेकेशन नोटीस स्विकारत नसल्याने हे प्रकरण मंडळापुढे आले आहे. संबंधित भाडेकरुंची मागणी मान्य केल्यास हयापूर्वी झालेल्या प्रकरणांमध्ये आपण अन्याय केल्यासारखे होईल तसेच हयापुढील प्रकरणातही आपणास हया प्रंकरणाप्रमाणेच निर्णय घ्यावा लागेल.

सविस्तर चर्चेअंती हयाबाबतच्या कायदेशीर बाबी तपासण्याचे सर्वानुमते ठरले.

-------------------------------XoXo-------------------------

५) विषय- पुनर्रचित इमारतीमधील मालकी तत्वावरील मोफत २२५ चौ.फू. सदनिकेचे वितरण झाल्यानंतर विक्री केलेल्या सदनिकांचे नियमितीकरण करणेबाबत.

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयात पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सहमुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, काही पुनर्रचित इमारती मालकी हक्काने हस्तांतरित केल्या आहेत. मात्र अद्याप त्यांच्या स.गृ.नि.संस्था स्थापन झालेल्या नाहीत. अशा इमारतीतील गाळयांच्या नियमितीकरणाबाबत मंडळाने पूर्वी असा निर्णय घेतला आहे की, हया गाळयांचे नियमितीकरण मंडळाने न करता स.गृ.नि.संस्था स्थापन झाल्यानंतर स.गृ.नि.संस्थांनी करावे जेणेकरुन नियमितीकरणापोटी उपलब्ध होणारी रक्कम स.गृ.नि.संस्थेस इमारतीच्या दैनंदिन देखरेखीसाठी उपलब्ध होईल. मात्र स.गृ.नि.संस्था सहा महिन्यात स्थापन झाली नाही तर मंडळाने नियमितीकरण करावे. ब-याचशा पुनर्रचित इमारतींच्या स.गृ.नि.संस्था ६ महिन्यांनंतरही स्थापन झालेल्या नाहीत. अशा परिस्थितीत गाळयांचे नियमितीकरण मंडळाने करावे किंवा कसे हयाबाबत निर्णय घेण्यासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मंडळाने अशा गाळयांचे नियमितीकरण केल्यास मंडळाला रु. २७.०० लाख आर्थिक उत्पन्न मिळेल.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, इमारत पुनर्रचित केल्यानंतर काही भाडेकरु/रहिवाशी त्यांचे गाळे विकतात व संबंधित नवीन भाडेकरु/रहिवाशांनी त्यांच्या नावे गाळा नियमित करण्याची विनंती केल्यास मंडळ शुल्क आकारुन गाळयाचे नियमितीकरण करते. तदनंतर पुनर्रचित गाळयातील रहिवाशांची स.गृ.नि.संस्था स्थापन केली जाते. त्यानंतर हया इमारतीच्या दैनंदिन देखभालीसाठी आर्थिक उत्पन्न कसे उभारावे हा रहिवाशांना प्रश्न पडतो. त्यामुळे मंडळाने पूर्वी असा निर्णय घेतला होता की, इमारतीच्या दैनंदिन देखभालीसाठी आर्थिक उत्पन्नाचा मार्ग म्हणून गाळयांचे नियमितीकरण मंडळाने सहा महिन्यापर्यंत थांबवावे व हया सहा महिन्यांच्या आत रहिवाशांनी स.गृ.नि.संस्था स्थापन करुन घेऊन तदनंतर गाळयांचे नियमितीकरण स.गृ.नि.संस्थानी करावे. रहिवाशांच्या स.गृ.नि.संस्था जर वर्ष-सहा महिन्यांत स्थापन होत नसतील तर मग गाळयांच्या नियमितीकरणाचा प्रश्न सुटणार नाही.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, 'विजयश्री' इमारतीबाबत ४-५ महिन्यांनतरही स.गृ.नि.संस्था स्थापन झालेली नाही व येत्या ३-६ महिन्यात

त्यांची स.गृ.नि.संस्था स्थापन होईल असे संबंधित अधिका-यांनी त्यांना सांगितले आहे. हयामध्ये इमारतीतील रहिवाशांची काहीच चूक नाही त्यामुळे स.गृ.नि.संस्था स्थापन करण्याची मुदत सहा महिन्यांऐवजी १ वर्षाची करावी अशी विनंती मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत यांनी केली.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हा प्रश्न १३ इमारतींबाबत आहे. हयामधील रहिवाशांच्या अनेक अडचणी असून त्यांची बिले त्यांच्या नावावर होत नाहीत तसेच ते बँकेकडून कर्जही घेऊ शकत नाहीत. हयामुळे सहा महिन्यानंतरही मुदत वाढवून दिल्यास त्या रहिवाशांच्या अडचणी तशाच राहणार आहेत.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ज्या रहिवाशांना हया अडचणी येतात ते इमारतीतील मुळ रहिवाशी नसून गाळा विकत घेतलेले रहिवाशी आहेत. इमारतीतील रहिवाशांवर जो आर्थिक बोजा पडणार आहे तो कमी करण्याच्या दृष्टीने आपण पूर्वी निर्णय घेतला होता जेणेकरुन इमारतीला कॉपर्स निधी उपलब्ध होईल. मा. सदस्य श्री. रमेश परब यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ही मंडळाची शतक महोत्सवी बैठक असल्याने जनतेच्या हिताचे निर्णय घ्यावेत.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मुंबई शहरातील मराठी माणूस मुंबईबाहेर स्थलांतरित न होण्याच्यादृष्टीने रहिवाशांच्या हिताचा निर्णय घेणे आवश्यक आहे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने अशा सूचना दिल्या की, अशा इमारतींबाबत एक महिन्याची नोटीस द्यावी व जर एक महिन्याच्या आत स.गृ.नि.संस्था स्थापन झाली नाही तर मात्र आपण मंडळाच्या पुढील बैठकीत निर्णय घेऊ. मात्र स.गृ.नि.संस्था स्थापन करण्यास मंडळाकडूनच जर विलंब होत असेल तर मात्र त्यांना विलंबाचा कालावधी वाढवून द्यावा लागेल. हया सर्वानुमते सहमती दर्शविण्यात आली.

---------------ooXXoo---------------

५) विषय- इ.क्र. ३९१ए, ३९१बी,३९१सी,३९१डी,३९१ई व ३८७-३८९ ३८७-३९७,बदामवाडी, मारवाडी चाळ, व्ही.पी.रोड, गिरगाव, मुंबई हया सहा इमारतींना म्हाड अधिनियमांतर्गत कलम ८८ (३)(अ) व (ब) नुसार प्रमाणपत्र जारी करण्याबाबत.

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयात पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, डी-१ विभाग यांनी असे प्रतिपादन केले की, इ.क्र. ३९१ ए ते ई हया पाच इमारतींना ८८ (३)(अ) व इ.क्र. ३८७-३८९ व ३८७-३९७ हया

इमारतीस कलम ८८ (३)(ब) प्रमाणपत्र जारी करण्यासाठी मंडळाची मंजूरी आवश्यक आहे. हया इमारतींची संयुक्त पुनर्बांधणी योजना शक्य आहे.

हया कामी मंडळाचे अधिकारी श्री. बांदलकर, श्री. सेहगल, श्री. वणीकर साहेब यांनी अतिशय चांगले काम केल्याने मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत यांनी मंडळातर्फे व त्यांच्यातर्फे धन्यवाद दिले.

प्रभारी उपमुख्य अभियंता, (द.) यांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीतल गाळे बंद आढळल्याने त्यातील भाडेकरु/रहिवाशांची नावे निश्चित करता आलेली नाहीत. हया इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र.पत्र दिले होते. ना.ह.प्र.पत्र प्रस्तावातील कागदपत्रांची छाननी करुन त्यानुसार भाडेकरु/रहिवाशांच्या नावांमध्ये व क्षेत्रफळामध्ये सुधारणा कराव्या लागणार आहेत.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, ना.ह.प्र.पत्र देताना असलेल्या भाडेकरु/रहिवाशांची नावे व आता असलेल्या भाडेकरु/रहिवाशांची नावे वेगळी असतील तर आता असलेल्या रहिवाशांची नावे ग्राहय धरली जातील का ? ८८ (३)(अ) प्रमाणपत्र जारी करण्यापूर्वीच हयाबाबत छाननी करुन भाडेकरु/रहिवाशांची यादी निश्चित करावी. आपण ८८ (३) (अ) प्रमाणपत्र जारी करुन भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरही आपण संबंधित भाडेकरु/रहिवाशांकडून वर्षानुवर्षे भाडे गोळा करीत नाही. हयामुळे रहिवाशांचा असा समज निर्माण होतो की, त्यांचा मालक मंडळ नसून मुळ इमारत मालकच आहे. त्यामुळे मा. सभापती यांनी सहमुख्य अधिकारी यांना असे आदेश दिले की, अशा इमारतींबाबत भाडेवसुलीकारांना भाडे गोळा करण्याचे आदेश द्यावेत.

का.अ./डी-१ विभाग हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, हया इमारतीतील काही गाळे बंद आढळल्याने त्यातील भाडेकरु/रहिवाशांची नावे निश्चित करता आलेली नाहीत. ज्यावेळी व्हेकेशन नोटीस देण्याची वेळ येईल मुळ भाडेकरु/रहिवाशांऐवजी अन्य भाडेकरु/रहिवाशी आढळल्यास मंडळापुढे प्रस्ताव सादर करावा लागेल. ना हरकत प्रमाणपत्र ८ वर्षांपूर्वी दिले होते. त्यामुळे भाडेकरु/रहिवाशी बदलले असण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्विकासासाठी ना.ह.प्र.पत्र घेतल्यानंतर मालकाने काही भाडेकरु/रहिवाशाना हुसकावून लाऊन त्यांचे गाळे ताब्यात घेतले आहेत व त्यामध्ये त्याचे नोकर-चाकर राहतात. मंडळाचे अधिकारी जेव्हा पाहणीसाठी जातात तेव्हा मालक सदर गाळयांना कुलूप लावून बंद करतो जेणेकरुन त्यामधील भाडेकरु/रहिवाशाची माहिती अधिका-यांना प्राप्त होऊ नये.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे आदेश दिले की, ज्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र.पत्र देऊन बराच कालावधी होऊनही पुनर्विकासाबाबतची कार्यवाही अद्याप सुरु झालेली नाही अशा प्रकरणात ना.ह.प्र.पत्र रद्द करण्याची कार्यवाही त्वरित करावी.

सविस्तर चर्चेअंती हया इमारतींना म्हाड अधिनियमाच्या कलम ८८ (३)(अ) व (ब) नुसार प्रमाणपत्र जारी करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : १००/८२८

इ.क्र. ३९१ए ते ई व्ही.पी.रोड, गिरगाव, मुंबई हया पाच इमारतींना म्हाड अधिनियमाच्या कलम ८८ (३)(अ) व (ब) नुसार तसेच इ.क्र. ३८७-३८९-३९७,बदामवाडी, मारवाडी चाळ इमारतीस म्हाड अधिनियमाच्या कलम ८८ (३) (ब) नुसार प्रमाणपत्र जारी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---oxox---

(७) विषय- मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याच्या प्रकरणांबाबत.

....

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयात पटलावर सादर करण्यात आला आहे.

सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता यांनी सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने असे प्रतिपादन केले की, शासनाकडून नुकत्याच प्राप्त झालेल्या आदेशांनुसार ज्या उपकरप्राप्त इमारतींच्या भूखंडाचे क्षेत्रफळ ५००.०० चौ.मी. पेक्षा अधिक आहे अशा प्रस्तावांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यापूर्वी शासनाची मान्यता घ्यावी. त्यामुळे हया बैठकीमध्ये असे प्रस्ताव सादर करावयाचे किंवा कसे हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, जर ७० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक रहिवाशांच्या अपरिवर्तनीय संमतीपत्रासह मंडळाकडे ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याची विनंती केल्यास ना.ह.प्र.पत्र प्रदान करणे ही मंडळाची नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे ज्या भूखंडाचे क्षेत्रफळ ५०० चौ.मी.पेक्षा जास्त आहे अशा इमारतींचे प्रस्ताव आजच्या मंडळाच्या बैठकीपुढे सादर करावेत तसेच शासनाच्या आदेशांच्या अनुषंगाने विधी विभागाचे अभिप्राय घ्यावेत. ना.ह.प्र.पत्रे शासनाच्या नगर विकास विभागाच्या सुधारित वि.नि.नि.क्र.३३ (७) नुसार दिली जातात. त्यामुळे शासनाच्या नगर विकास विभागाकडून जोपर्यंत आदेश येत नाहीत तोपर्यंत सर्व प्रकरणांमध्ये ना.ह.प्र.पत्रे मंडळाच्या मान्यतेने देण्यात यावीत. हयाबाबत सन्मा. मंत्री महोदय यांच्याशी नुकतीच चर्चा करण्यात आली असून त्यांना असे सांगण्यात आले की, ना.ह.प्र.पत्र शासन स्तरावर द्यावयाची असल्यास काही हरकत नाही. मात्र त्यासाठी शासन स्तरावर स्वतंत्र मंडळाची स्थापना करावी. विधी विभागाचे अभिप्राय घेऊन शासनास वरीलप्रमाणे कळविण्याचे आदेश मा. सभापती यांनी दिले.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाची स्थापना ही मुलतः उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती व पुनर्रचनेसाठी झालेली आहे. असे असताना काही ठराविक इमारतींच्या पुनर्रचनेसाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे मंडळाचे अधिकार काढून घेणे योग्य नाही. ना हरकत प्रमाणपत्र शासनाच्या मान्यतेने द्यावयाचे आहे तर मग त्याबाबतचा निर्णय मंडळाची स्थापना करण्यापूर्वीच शासनाने घ्यावयास हवा होता. मंडळाची स्थापना झाल्यापासून सर्व प्रकरणांमध्ये मंडळाच्या मान्यतेने ना हरकत प्रमाणपत्रे दिली गेली आहेत. उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे ही मंडळाची नैतिक जबाबदारी असल्याने सर्व प्रकरणांमध्ये पूर्वीप्रमाणेच मंडळाच्या मान्यतेने ना हरकत प्रमाणपत्रे द्यावीत. हयाबाबत विधी विभागाच्या सल्ल्यानुसार सदर बाब उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या नजरेस आणून शासनास तसे कळविण्यात यावे.

सविस्तर चर्चेअंती सर्व प्रकरणांमध्ये उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र मंडळाच्या मान्यतेनेच देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले तसेच विधी विभागाच्या सल्ल्यानुसार सदर बाब उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या नजरेस आणून शासनास तसे कळविण्यात यावे असेही सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : १००/८२९

उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी पूर्वीप्रमाणेच ना हरकत प्रमाणपत्र मंडळाच्या मान्यतेने प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली तसेच सदर बाब उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या नजरेस आणून शासनास कळविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---------------------------ooXXoo---------------------------

८) विषय- मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरिता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे प्रस्ताव.

....

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुर्नविकासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे खालील ३६ प्रस्ताव पटलावर मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

१) भुकर पहाणी क्र.६०६,गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१६३३, इ.क्र.२२६ ए, व्ही.पी.रोड, गिरगाव, मुंबई येथील " मोगरे हाऊस " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२) भुकर पहाणी क्र.१/१८२६ माहीम विभाग, भूखंड क्र. ११६ ए, शिवाजी पार्क स्कीम, विभाग क्र.जीएन-४३७२ (२ए) इ.क्र.६५ए, एस.पी.रोड क्र.१ (एम.बी.राऊत रोड), दादर, मुंबई येथील " निरंजन" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत

३) अंतिम भूखंड क्र.४७५,नगररचना योजना क्र.३,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-५७९९ (५ए),इ.क्र.६,पितांबर लेन, माहिम, मुंबई येथील " सिध्दरुधा निवास" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

४) अंतिम भूखंड क्र.४५६,नगररचना योजना क्र.४,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-३२९९ (११), इ.क्र.९२, भवानी शंकर रोड, दादर (प.), मुंबई येथील " अमृत निवास" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

५) अंतिम भूखंड क्र.१०१६,नगररचना योजना क्र.४,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-३४०९ (१६),इ.क्र.६-११,नर्दुल्ला टँक, पहिली घरगल्ली (सयानी रोड), मुंबई येथील " लाल चाळ" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

६) भुकर पहाणी क्र.१४५६, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३५१६-१७ इ.क्र.१-७,२-१२, चौथी पिरखान स्ट्रीट (३७०-३८२, सर जे.जे.रोड), ई. विभाग, भायखळा,मुंबई येथील "कागलवाला बिल्डिंग" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

७) भुकर पहाणी क्र.२९५, गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-५६४, इ.क्र.३६ डी,तात्या घारपूरे पथ (मुगभाट क्रॉस लेन),गिरगाव, मुंबई येथील "नरेंद्र सदन" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

८) भुकर पहाणी क्र.११६८,गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१९०० (७), इ.क्र.२,तारा टेम्पल, गिरगाव, मुंबई येथील " जोशी बिल्डिंग" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत

९) भुकर पहाणी क्र.११३९,गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-२०६१ (६), इ.क्र.२१-२३-२५ पाववाला स्ट्रीट, गिरगाव, मुंबई येथील " गायकवाड हाऊस " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

१०) भुकर पहाणी क्र.३६०, माझगांव विभाग, विभाग क्र.ई-६२१७ (४) इ.क्र.११ व ९, हाथीबाग रोड, माझगांव, मुंबई येथील " बतुल हाऊस " नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

११) भुकर पहाणी क्र.४१३,गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-८२, इ.क्र. १२-१४ ठाकूरद्वार रोड (बाबासाहेब जयकर मार्ग) , गिरगाव, मुंबई येथील "हार्मोणी होम" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

१२) अंतिम भूखंड क्र.१९५,नगररचना योजना क्र.३,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-४०९०(१०) व क्र. जीएन-४०९० (१०ए), इ.क्र.४५१ जे व ४५१ आय लेडी जमशेटजी रोड, माहिम, मुंबई येथील " सुहास बिल्डिंग" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

१३) भुकर पहाणी क्र.२९६,गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-५६३, इ.क्र.३६ई, मुगभाट कॉस लेन, गिरगाव, मुंबई येथील " अगरवाल हाऊस " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

१४) भुकर पहाणी क्र.४६९-१० माटुंगा विभाग, भूखंड क्र.६१, दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एम.एन.७९००(३), इ.क्र.९, हिन्दू कॉलनी रोड क्र.१९ए, माटुंगा,मुंबई येथील " काशी केतन" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

१५) भुकर पहाणी क्र.१४१ मांडवी विभाग, विभाग क्र.बी-१५५८, इ.क्र.२०,ओल्ड बंगालीपूरा, मुंबई हया मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

१६) भुकर पहाणी क्र., ३२७६, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-६०८४ इ.क्र.२२,अली उमर स्ट्रीट, मुंबई येथील ' फातिमा बिल्डिंग ' नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१७) भुकर पहाणी क्र.२९६/१० माटुंगा विभाग, विभाग क्र. एफ.एन.७४४० (१३), इ.क्र.५, तेलंग क्रॉस रोड, माटुंगा, मुंबई येथील " दफ्तरी निवास " नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

१८) भुकर पहाणी क्र.८१,मांडवी विभाग, विभाग क्र.बी-२२३, इ.क्र.२४२-२४६, नागदेवी स्ट्रीट, मुंबई येथील " आदम मंझील " हया मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

१९) भुकर पहाणी क्र.१८०९ आणि १८१८,मांडवी विभाग, विभाग क्र.बी-३४२९ व ३४३०, इ.क्र.२९-३१ व ३३-३७ जेल रोड (दक्षिण), डोगरी, मुंबई येथील " अल्लारखा बिलिडंग " व " धनजीभाई बिलिडंग " हया मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२०) भुकर पहाणी क्र., ३२१४, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-५८८३ इ.क्र.७३-७५, किका स्ट्रीट, मुंबई हया मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

२१) भुकर पहाणी क्र.१४५४, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३५०७ व ३५०८, इ.क्र.१४,१६,चौथी पीरखान लेन, नागपाडा, मुंबई येथील "कराचीवाला बिल्डिंग" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२२) भुकर पहाणी क्र.४८२, माझगांव विभाग, विभाग क्र.ई-५९४९ (१) इ.क्र.५८ एफ, मातार पाखाडी रोड, माझगांव, मुंबई येथील " अशोक निवास" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२३) अंतिम भूखंड क्र.११९९,नगररचना योजना क्र.४, माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-२७०० (१),२६९८ (२), २६९८ (२सी) २६९८ (२बी), २६९८ (२ए), इ.क्र.११ए, १३, १३ए, १३बी व १३सी, पालखी गल्ली, (काशिनाथ धुरु रोड), दादर मुंबई येथील " पुष्पकुंज" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२४) भुकर पहाणी क्र.२५८, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-६३८३-८६ इ.क्र.५८-६०, दुसरी पिरखान स्ट्रीट, ई. विभाग, भायखळा,मुंबई येथील "मुस्तफा मंझील" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२५) भुकर पहाणी क्र,२४२ भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३४२५(१ व २), इ.क्र.१७-१९, शेफर्ड रोड, (८५, वेलअर रोड), नागपाडा, मुंबई येथील "मद्रासवाला बिलिडंग " नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२६) भुकर पहाणी क्र.२७६, ताडदेव विभाग, विभाग क्र.डी-४५५३ (१) इ.क्र.२० (आय) गिल्डर लेन, ताडदेव, मुंबई येथील ' वाडीया हाऊस' नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

२७) भुकर पहाणी क्र.७५६बी /१० माटुंगा विभाग, भूखंड क्र.४७१बी, दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफ.एन.६९५९(२), इ.क्र.५२६ए, किंग्ज सर्कल, माटुंगा,मुंबई येथील " आशिर्वाद" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२८) भुकर पहाणी क्र.६५७,गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१५९२ (१-२), इ.क्र.२५-२७ डॉ. देशमुख लेन, गिरगाव, मुंबई येथील " गोवर्धन भुवन " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२९) भुकर पहाणी क्र.५२२/१० माटुंगा विभाग, भूखंड क्र. एफ.एन.७१९४ (४), इ.क्र.२८जामे जमशेद रोड, माटुंगा, मुंबई येथील " दासा मॅन्शन" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

३०) भुकर पहाणी क्र.१/३७८, माझगांव विभाग, विभाग क्र.ई-६१४९ (१) इ.क्र.४४-४४ ए, नेसबीट रोड, माझगांव, मुंबई येथील " देधमवाला बिल्डिंग " नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

३१) भुकर पहाणी क्र.१६२३, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-४१०६ (६), इ.क्र.३, क्लब बॅक रोड, (वाय.एम.सी.ए.रोड), आग्रीपाडा, मुंबई येथील "फ्रेडरिक हाऊस " नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

३२) भुकर पहाणी क्र.२८१/१० माटुंगा विभाग,भूखंड क्र.३५९ एफ.एन.७४४० (९), इ.क्र.७,भांडारकर रोड, माटुंगा, मुंबई या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

३३) भुकर पहाणी क्र.४/१४९२, फोर्ट विभाग, विभाग क्र.ए-३४२३ (६) इ.क्र.४२,५०, पलटण रोड, के ब्लॉक, मुंबई येथील " सिताराम बिल्डिग-ए" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

३४) भुकर पहाणी क्र.११०२, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३५४-३५५ आणि ३५६, इ.क्र.३५-५५, खांडीया स्ट्रीट, ई. विभाग, भायखळा,मुंबई येथील "चोकूवाला चाळ" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

३५) भुकर पहाणी क्र.१९८७, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-४८७०(१) व ४८७१-७४, ४८७५-७९, इ.क्र.३० व २८१-४, नविवाडी, मुंबई येथील " नारायण निवास "नावाने ओळखलया जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

३६) भुकर पहाणी क्र.३७५, माझगांव विभाग, विभाग क्र.ई-६१८३ (१)(८), ६१८५ (१)(१बी),(२), ६१८३ (२), ६१८३(६),(६ए), (७) (९) (१०) (११)५१८४, ६१८५ (१ए) (१सी) (३). ६१८५ (३ए), ६१८३ (३ए),६१८५ (१के),(४), ६१८३ (१ए),६१८४ (४), ६१८३ (५), इ.क्र.१०५बी, १०१-१०३, १०५-के, १०५ (एम) १०५ (जे), १०५ (आय), १०५ (जी), १०५ (जी जी, १०५, १०५(ए ए), १०५(आर), १०५(एच), १०५(एल), १०५(पी), १०५(ए),१०५(ओ), १०५(इ ए), १०५(ई), लव लेन (मोतीशा रोड) माझगांव, मुंबई येथील " ताराबाग ऐक्यवर्धक स.गृ.नि.संस्था " नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

मुख्य अधिकारी हयांनी सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने असे प्रतिपादन केले की, भू.पा.क्र.४६९/१०, माटुंगा विभाग येथील ' काशी निकेतन ' हया इमारतीला उपकर आकारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्यामुळे जोपर्यंत हया इमारतीला अ. वर्गानुसार उपकर आकारण्यास शासनाकडून मंजूरी मिळत नाही तोपर्यंत ना हरकत प्रमाणपत्र देता येणार नाही तसेच भू.पा.क्र.३७५,

माझगाव विभाग येथील ताराबाग ऐक्यवर्धक स.गृ.नि.संस्था येथील इमारतींच्या पुनर्विकासाबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, हया भूखंडावर एकूण २४ उपकरप्राप्त इमारती असून त्यामध्ये एकूण १४५ भाडेकरु/रहिवाशी आहेत. हया भूखंडावर पूर्वी तळ + १५ मजले स्वरुपाची नवीन इमारत बांधण्यात आली असून त्यामध्ये जून्या इमारतीतील ३७ भाडेकरु/रहिवाशांचे पुनर्वसन करण्यात आले आहे ज्यांची यादी का.अ./ई.विभाग यांनी प्रमाणित केलेली नाही व अद्याप १०८ भाडेकरु/रहिवाशांचे पुनर्वसन करावयाचे आहे. हयापैकी २७ रहिवाशी हे झोपडपट्टीत रहात असल्याने त्यांची पात्रता सक्षम प्राधिका-यांनी निश्चित करावी लागणार आहे व हयामुळे हया २७ भाडेकरु/रहिवाशांची यादी व त्यांचे क्षेत्रफळ का.अ./ई.विभाग यांनी प्रमाणित केलेले नाही. उर्वरित ८१ रहिवाशांपैकी अर्जदारांनी ४९ रहिवाशांची अपरिवर्तनीय संमतीपत्रे सादर केली आहेत. हया मालमत्तेवरील एकूण १४५ भाडेकरु/रहिवाशी असल्याने अर्जदाराने त्यापैकी किमान ७० टक्के रहिवाशांची अपरिवर्तनीय संमतीपत्रे ना.ह.प्र.पत्र प्रदान केल्याच्या दिवसापासून ३ महिन्यांच्या आत सादर करावी लागतील अन्यथा ना.ह.प्र.पत्र रद्द होईल अशी अट सदर प्रस्ताव मान्य करण्याचे ठरविल्यास ना.ह.प्र.पत्रात समाविष्ट करावी लागेल तसेच नवीन इमारतीत पुनर्वसन केलेल्या ३७ रहिवाशांपैकी ज्या रहिवाशांना २२५.०० चौ.फू. चटईक्षेत्रफळापेक्षा कमी क्षेत्रफळाचे गाळे दिले आहेत त्या रहिवाशांना नवीन बांधल्या जाणा-या इमारतीत २२५.०० चौ.फू. चटईक्षेत्रफळाचे गाळे द्यावे लागतील. तसेच झोपडपट्टीत राहणा-या २७ भाडेकरु/रहिवाशांची पात्रता सक्षम प्राधिका-याकडून ना.ह.प्र.पत्र प्रदान केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत निश्चित करुन घ्यावी लागेल अन्यथा ना.ह.प्र.पत्र रद्द होईल.

उर्वरित प्रस्तावांमध्ये किमान ७० टक्क्यापेक्षा अधिक रहिवाशांची अपरिवर्तनीय संमतीपत्रे अर्जदारांनी सादर केली असून रहिवाशांची यादी, त्यांच्या गाळयांचे क्षेत्रफळ व रहिवाशांची अपरिवर्तनीय संमतीपत्रे विभागीय कार्यालयाने तपासून प्रमाणित केली आहेत.

वरील सविस्तर चर्चेअंती वरील ३६ प्रस्तावांमध्ये प्रस्तावत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना.ह.प्र.पत्र प्रदान करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले. तसेच मुख्य अधिकारी यांनी वरील दोन प्रस्तावांबाबत प्रतिपादन केल्यानुसार कार्यवाही करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

<u>ठराव क्रमांक : १००/८३०</u>

मुंबई बेटावरील खालील उपकरप्राप्त इमारतींच्या पुर्नविकासाठी प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून तसेच मुख्य अधिकारी यांनी दोन प्रस्तावांबाबत प्रतिपादन केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१) भुकर पहाणी क्र.६०६,गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१६३३, इ.क्र.२२६ ए, व्ही.पी.रोड, गिरगाव, मुंबई येथील " मोगरे हाऊस ".

२) भुकर पहाणी क्र.१/१८२६ माहीम विभाग, भूखंड क्र. ११६ ए, शिवाजी पार्क स्कीम, विभाग क्र.जीएन-४३७२ (२ए) इ.क्र.६५ए, एस.पी.रोड क्र.१ (एम.बी.राऊत रोड), दादर, मुंबई येथील " निरंजन"

३) अंतिम भूखंड क्र.४७५,नगररचना योजना क्र.३,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-५७९९ (५ए),इ.क्र.६,पितांबर लेन, माहिम, मुंबई येथील " सिध्दरुधा निवास"

४) अंतिम भूखंड क्र.४५६,नगररचना योजना क्र.४,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-३२९९ (११), इ.क्र.९२, भवानी शंकर रोड, दादर (प.), मुंबई येथील " अमृत निवास".

५) अंतिम भूखंड क्र.१०१६,नगररचना योजना क्र.४,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-३४०९ (१६),इ.क्र.६-११,नर्दुल्ला टँक, पहिली घरगल्ली (सयानी रोड), मुंबई येथील " लाल चाळ".

६) भुकर पहाणी क्र.१४५६, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३५१६-१७ इ.क्र.१-७,२-१२, चौथी पिरखान स्ट्रीट (३७०-३८२, सर जे.जे.रोड), ई. विभाग, भायखळा,मुंबई येथील "कागलवाला बिल्डिंग"

७) भुकर पहाणी क्र.२९५, गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-५६४, इ.क्र.३६ डी,तात्या घारपूरे पथ (मुगभाट क्रॉस लेन),गिरगाव, मुंबई येथील "नरेंद्र सदन".

८) भुकर पहाणी क्र.११६८,गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१९०० (७), इ.क्र.२,तारा टेम्पल, गिरगाव, मुंबई येथील " जोशी बिल्डिंग"

९) भुकर पहाणी क्र.११३९,गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-२०६१ (६), इ.क्र.२१-२३-२५ पाववाला स्ट्रीट, गिरगाव, मुंबई येथील " गायकवाड हाऊस ".

१०) भुकर पहाणी क्र.३६०, माझगांव विभाग, विभाग क्र.ई-६२१७ (४) इ.क्र.११ व ९, हाथीबाग रोड, माझगांव, मुंबई येथील " बतुल हाऊस " नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

११) भुकर पहाणी क्र.४१३,गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-८२, इ.क्र. १२-१४ ठाकूरव्दार रोड (बाबासाहेब जयकर मार्ग) , गिरगाव, मुंबई येथील "हार्मोणी होम"

१२) अंतिम भूखंड क्र.१९५,नगररचना योजना क्र.३,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-४०९०(१०) व क्र. जीएन-४०९० (१०एए), इ.क्र.४५१ जे व ४५१ आय लेडी जमशेटजी रोड, माहिम, मुंबई येथील " सुहास बिल्डिंग".

१३) भुकर पहाणी क्र.२९६,गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-५६३, इ.क्र.३६ई, मुगभाट कॉस लेन, गिरगाव, मुंबई येथील " अगरवाल हाऊस ".

१४) भुकर पहाणी क्र.४६९-१० माटुंगा विभाग, भूखंड क्र.६१, दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एम.एन.७९००(३), इ.क्र.९, हिन्दू कॉलनी रोड क्र.१९ए, माटुंगा,मुंबई येथील " काशी केतन"

१५) भुकर पहाणी क्र.१४१ मांडवी विभाग, विभाग क्र.बी-१५५८, इ.क्र.२०,ओल्ड बंगालीपूरा, मुंबई

१६) भुकर पहाणी क्र., ३२७६, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-६०८४ इ.क्र.२२,अली उमर स्ट्रीट, मुंबई येथील ' फातिमा बिल्डिंग '

१७) भुकर पहाणी क्र.२९६/१० माटुंगा विभाग, विभाग क्र. एफ.एन.७४४० (१३), इ.क्र.५, तेलंग क्रॉस रोड, माटुंगा, मुंबई येथील " दफ्तरी निवास "

१८) भुकर पहाणी क्र.८१,मांडवी विभाग, विभाग क्र.बी-२२३, इ.क्र.२४२-२४६, नागदेवी स्ट्रीट, मुंबई येथील " आदम मंझील "

१९) भुकर पहाणी क्र.१८०९ आणि १८१८,मांडवी विभाग, विभाग क्र.बी-३४२९ व ३४३०, इ.क्र.२९-३१ व ३३-३७ जेल रोड (दक्षिण), डोंगरी, मुंबई येथील " अल्लारखा बिलिडंग " व " धनजीभाई बिलिडंग "

२०) भुकर पहाणी क्र., ३२१४, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-५८८३ इ.क्र.७३-७५, किका स्ट्रीट, मुंबई

२१) भुकर पहाणी क्र.१४५४, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३५०७ व ३५०८, इ.क्र.१४,१६,चौथी पीरखान लेन, नागपाडा, मुंबई येथील "कराचीवाला बिल्डिंग".

२२) भुकर पहाणी क्र.४८२, माझगांव विभाग, विभाग क्र.ई-५९४९ (१) इ.क्र.५८ एफ, मातार पाखाडी रोड, माझगांव, मुंबई येथील " अशोक निवास".

२३) अंतिम भूखंड क्र.११९९,नगररचना योजना क्र.४, माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-२७०० (१),२६९८ (२), २६९८ (२सी) २६९८ (२बी), २६९८ (२ए), इ.क्र.११ए, १३, १३ए, १३बी व १३सी, पालखी गल्ली, (काशिनाथ धुरु रोड), दादर मुंबई येथील " पुष्पकुंज".

२४) भुकर पहाणी क्र.२५८, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-६३८३-८६ इ.क्र.५८-६०, दुसरी पिरखान स्ट्रीट, ई. विभाग, भायखळा,मुंबई येथील "मुस्तफा मंझील".

२५) भुकर पहाणी क्र,२४२ भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३४२५(१ व २), इ.क्र.१७-१९, शेफर्ड रोड, (८५, केलअर रोड), नागपाडा, मुंबई येथील "मद्रासवाला बिलिडंग ".

२६) भुकर पहाणी क्र.२७६, ताडदेव विभाग, विभाग क्र.डी-४५५३ (१) इ.क्र.२० (आय) गिल्डर लेन, ताडदेव, मुंबई येथील ' वाडीया हाऊस'.

२७) भुकर पहाणी क्र.७५६बी /१० माटुंगा विभाग, भूखंड क्र.४७१बी, दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफ.एन.६९५९(२), इ.क्र.५२६ए, किंग्ज सर्कल, माटुंगा,मुंबई येथील " आशिर्वाद".

२८) भुकर पहाणी क्र.६५७,गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१५९२ (१-२), इ.क्र.२५-२७ डॉ. देशमुख लेन, गिरगाव, मुंबई येथील " गोवर्धन भुवन ".

२९) भुकर पहाणी क्र.५२२/१० माटुंगा विभाग, भूखंड क्र. एफ.एन.७१९४ (४), इ.क्र.२८जामे जमशेद रोड, माटुंगा, मुंबई येथील " दासा मॅन्शन".

३०) भुकर पहाणी क्र.१/३७८, माझगांव विभाग, विभाग क्र.ई-६१४९ (१) इ.क्र.४४-४४ ए, नेसबीट रोड, माझगांव, मुंबई येथील" देधमवाला बिल्डिंग".

३१) भुकर पहाणी क्र.१६२३, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-४१०६ (६), इ.क्र.३, क्लब बॅक रोड, (वाय.एम.सी.ए.रोड), आग्रीपाडा, मुंबई येथील "फ्रेडरिक हाऊस ".

३२) भुकर पहाणी क्र.२८१/१० माटुंगा विभाग,भूखंड क्र.३५९ एफ.एन.७४४० (९), इ.क्र.७,भांडारकर रोड, माटुंगा, मुंबई.

३३) भुकर पहाणी क्र.४/१४९२, फोर्ट विभाग, विभाग क्र.ए-३४२३ (६) इ.क्र.४२,५०, पलटण रोड, के ब्लॉक, मुंबई येथील " सिताराम बिल्डिग-ए".

३४) भुकर पहाणी क्र.११०२, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३५४-३५५ आणि ३५६, इ.क्र.३५-५५, खांडीया स्ट्रीट, ई. विभाग, भायखळा,मुंबई येथील "चोकूवाला चाळ".

३५) भुकर पहाणी क्र.१९८७, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-४८७०(१) व ४८७१-७४, ४८७५-७९, इ.क्र.३० व २८१-४, नविवाडी, मुंबई येथील " नारायण निवास ".

३६) भुकर पहाणी क्र.३७५, माझगांव विभाग, विभाग क्र.ई-६१८३ (१)(८), ६१८५ (१)(१बी),(२), ६१८३ (२), ६१८३(६),(६ए), (७) (९) (१०) (११)५१८४, ६१८५ (१ए) (१सी) (३). ६१८५ (३ए), ६१८३ (३ए),६१८५ (१के),(४), ६१८३ (१ए),६१८४ (४), ६१८३ (५), इ.क्र.१०५बी, १०१-१०३, १०५-के, १०५ (एम) १०५ (जे), १०५ (आय), १०५ (जी), १०५ (जी जी, १०५, १०५(ए ए), १०५(आर), १०५(एच), १०५(एल), १०५(पी), १०५(ए),१०५(ओ), १०५(इ ए), १०५(ई), लव लेन (मोतीशा रोड) माझगांव, मुंबई येथील "ताराबाग ऐक्यवर्धक स.गृ.नि.संस्था".

-----------x0x0x-----------

मा. सदस्य श्री. मोहन देसाई यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, पेरु चाळीच्या जागेमध्ये ज्या संक्रमण शिबीराच्या इमारती बांधण्यात आल्या आहेत त्यांचे भाडे रु. १४५०/- आहे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत आपण मागे असा निर्णय घेतला आहे की, हया गाळयांचे प्रत्यक्ष भाडे रु. २५००/- ते रु. ३०००/- पर्यंत होते. त्यामुळे आपण असे ठरविले की, हया गाळयांमधील ५० टक्के गाळे खाजगी विकासकांना जास्त दराने द्यावेत व उर्वरित ५० टक्के गाळे आपण आपल्या रहिवाशांना कमी दराने द्यावेत.

सहमुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत नंतर प्राधिकरणाने असा निर्णय घेतला आहे की, सर्वांना सारखेच भाडे आकारण्यात यावे. खाजगी विकासक ज्या रहिवाशांसाठी हे गाळे घेतो ते रहिवाशी उपकरप्राप्त इमारतीतीलच असल्याने त्यांनाही सारखेच भाडे आकारावे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, आपण जेव्हा स्वतः इमारतीची पुनर्रचना करतो तेव्हा रहिवाशांच्या पर्यायी जागेची व्यवस्था करण्याची जबाबदारी मंडळाची असते. मात्र इमारतीची पुनर्रचना जेव्हा खाजगी विकासकामार्फत केली जाते तेव्हा रहिवाशांच्या पर्यायी जागेची व्यवस्था करण्याची जबाबदारी मंडळाची नसते. त्यामुळे प्राधिकरणाने घेतलेला निर्णय अयोग्य आहे. बी.जी. शिर्के यांनी बांधलेल्या इमारतीतील संक्रमण गाळयांचे भाडे रु. १२००/- असून बैठया चाळीतील संक्रमण गाळयांचे भाडे रु.३००/- आहे.

सहमुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, वित्त नियंत्रक /प्रा. यांनी व्यक्त केलेल्या मतानुसार दोन्ही प्रकरणांमध्ये उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांना आपण संक्रमण शिबीरात पर्यायी जागा देत असल्याने त्यांना सरसकट एकच दर आकारावा लागेल.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, आपल्या रहिवाशांवरील आर्थिक बोजा कमी करण्याच्या दृष्टीने आपण वरीलप्रमाणे निर्णय घेतला होता. त्यामुळे मा. सभापती यांनी मुख्य लेखाधिकारी हयांना याबाबत मुख्य अभियंता / प्रा. व वित्त नियंत्रक / प्रा. यांच्याशी चर्चा करण्याचे व वस्तुस्थिती निदर्शनास आणून प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत यांनी तदनंतर अशी विचारणा केली की, अरुण क्रिडा मंडळाबाबतच्या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे. हया प्रकरणी बराच विलंब झालेला आहे व हयाबाबत तात्काळ पुढील कार्यवाही करण्यात यावी अशी विनंती केली. मुख्य अधिकारी यांन तदनुषंगाने हया प्रकरणाबाबत त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश कार्यकारी अभियंता, पु.वि.३ यांना दिले.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, अंतिम भूखंड क्र. ३०७, नगररचना योजना क्र. ४ माहिम हया मालमत्तेवर चंद्रकांत टी स्टॉल असून कोर्ट कमिशनरनी हया स्टॉलचे क्षेत्रफळ २००.०० चौ.फू. असल्याचे नमूद केले आहे व १५०.०० चौ.फू. ची मोकळी

जागा आहे. मात्र हयाबाबत मंडळाच्या अधिका-यांनी पाहणी करुन १५९.०० चौ.फू. क्षेत्रफळ प्रमाणित केले आहे. हया दुकानदाराला त्याच्या दुकानाची जागा त्वरित खाली करण्यासाठी विकासकाकडून व मंडळाकडून तगादा लावला जात आहे. हयाबाबत हया दुकानदारास ७ दिवसांच्या आत दुकानाची जागा खाली करण्याची नोटीसही दिली आहे. त्यामुळे मा. सदस्य श्री. सचिन सावंत यांनी हयाबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे हयाचा खुलासा करण्याची विनंती केली.

कार्य.अभि./फग-ऊ विभाग यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सदर दुकान हे पत्र्याचे शेड असून त्याचा काही भाग दुस-या मालमत्तेमध्ये आहे. कोर्ट कमिशनरने जे २००.०० चौ.फू. क्षेत्रफभ असल्याचे नमूद केले आहे ते हया संपूर्ण शेडचे क्षेत्रफळ आहे. हया मालमत्तेवर असणा-या दुकानाच्या भागाचे क्षेत्रफळ १५६.०० चौ.फू. आहे. त्यामुळे विकासक त्याला नवीन इमारतीत १५६.०० चौ.फू.चे क्षेत्रफळाचे दुकान देण्यास तयार आहे. हयाबाबत न्यायालयाने दिलेल्या आदेशांनुसार हया दुकानाचे जे अधिकृत क्षेत्रफळ आहे तेवढया क्षेत्रफळाचे दुकान नवीन इमारतीत द्यावयाचे आहे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत संबंधित दुकानधारक व विकासक हयांच्याबरोबर त्यांनी दोन-तीन वेळा चर्चा केली होती व त्या चर्चेमध्ये दुकानधारक व विकासक यांच्यामध्ये समझोता झाला होता व थोडया प्रमाणात क्षेत्रफळ वाढवूनही दिले आहे. कोर्टाच्या आदेशानुसार हया जागेची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असून विकासकाच्या जागेवर असलेल्या दुकानाच्या भागाचे क्षेत्रफळ १५६ चौ.फू. असल्याने विकासकाने बांधलेल्या इमारतीमध्ये १५६ चौ.फू.क्षेत्रफळाचे दुकान देण्यास तयार आहे. उर्वरित दुकानाच्या भागाचे क्षेत्रफळ देण्याची जबाबदारी त्यांची नाही असे विकासकाचे म्हणणे आहे. त्यामुळे चर्चेच्या वेळी विकासकाने १७०-१९० चौ.फू. क्षेत्रफळाचे दुकान नवीन इमारतीत देण्याचे मान्य केले होते व त्यास सदर दुकानदाराने सहमती दर्शविली होती. वस्तुतः दुकानाची जागा १५६ चौ.फूटच आहे. मात्र दुकानाच्या मागील मोकळया जागेचा वापर पाण्याची टाकी ठेवण्यासाठी, भांडी धुण्यासाठी केला जात असून सदर मोकळया जागेच्या क्षेत्रफळाचीही मागणी सदर दुकानदार करीत आहेत जे अयोग्य आहे. तदनंतर न्यायालयीन आदेशांनुसार दुकानाच्या जागेच्या क्षेत्रफळाची फेर तपासणी करुन हया मालमत्तेवर दुकानाचे जेवढे क्षेत्रफळ आहे तेवढया क्षेत्रफळाचे दुकान नवीन इमारतीत देणे आवश्यक आहे. मात्र तरीसुध्दा विकासक व दुकानदार यांच्याशी चर्चा करुन वाढीव क्षेत्रफळाचे दुकान देण्यामध्ये आपापसांत ठरले होते.

कार्य.अभि./फग-ऊ विभाग यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, विकासक व दुकानदार यांच्याबरोबर झालेल्या चर्चेनुसार विकासकाने वाढीव क्षेत्रफळाचे दुकान नवीन इमारतीत बांधले आहे. मात्र तदनंतरही सदर दुकानदार हया नवीन दुकानाचा ताबा घेण्यास तयार नाही. मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे आदेश दिले की, सदर दुकानदाराला म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ९६ (ए)

नुसार नोटीस देऊन स्थलांतरित करावे व जर न्यायालयीन स्थगिती आदेश असतील तर आपण काही करु शकत नाही. मात्र आपणांकडून जेवढी मदत शक्य आहे तेवढी मदत करावी.

मा. सदस्य श्री. रमेश परब यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, इ.क्र.१८, त्रिभुवन रोड, डी.विभाग हया इमारतीत एका रहिवाशाच्या मालकीच्या दोन खोल्या होत्या. हया दोन खोल्यांच्या बदल्यात नवीन इमारतीमध्ये त्यांना प्रत्येकी २२५ चौ.फू. चटई क्षेत्रफळाच्या दोन खोल्या देण्यात याव्यात अशी विनंती हया रहिवाशांतर्फे गेल्या २-३ वर्षांपासून केली जात आहे. मात्र अद्याप त्याला दोन खोल्या देण्यात आलेल्या नाहीत. जुन्या दोन खोल्यांच्या स्वतंत्र भाडेपावत्या असून व्हेकेशन नोटीसयमध्ये दोन्ही खोल्यांचे नंबर नमूद केलेले आहेत. मात्र हया दोन्ही खोल्यांचे क्षेत्रफळ एकत्र करुन नवीन इमारतीत २७० चौ.फू. क्षेत्रफळाचा गाळा देण्याची कार्यवाही सुरु आहे.

मुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, व्हेकेशन नोटीसमध्ये जर ३००.०० चौ.फू. चटई क्षेत्रफळाची नोंद असेल तर नवीन इमारतीत ३००.०० चौ.फू. चटई क्षेत्रफळाचा गाळा देण्यात येतो. आपण जर हया रहिवाशाची मागणी मान्य केली तर इतर रहिवाशीही त्याप्रमाणे गाळयांची मागणी करतील ज्यामुळे हया पुनर्रचित इमारतीत सर्व रहिवाशांचे पुनर्वसन होऊ शकणार नाही.

मा. सदस्य श्री. रमेश परब यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, दोन खोल्यांसाठी जर दोन स्वतंत्र भाडे पावत्या असतील तर दोन खोल्यांच्या बदल्यात नवीन इमारतीत दोन खोल्या मिळणे आवश्यक आहे.

मुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने विचारणा केली की, दोन खोल्यांसाठी दोन स्वतंत्र व्हेकेशन नोटीस दिल्या आहेत का ? तदनुषंगाने मा. सदस्य श्री. रमेश परब यांनी असे प्रतिपादन केले की, दोन खोल्यांसाठी जरी दोन स्वतंत्र व्हेकेशन नोटीस दिल्या नसल्या तरी एकाच व्हेकेशन नोटीसमध्ये दोन्ही खोल्यांचे नंबर नमूद केलेले आहेत.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, एका रहिवाशाकडे जर दोन खोल्या असतील तर व्हेकेशन नोटीस देताना त्यामध्ये दोन्ही खोल्यांचे नंबर नमूद केले जातात. एका माणसाच्या मालकीच्या जरी ४ खोल्या असल्या तरी आपण नवीन इमारतीत ४ खोल्यांच्या क्षेत्रफळाएवढी एकच खोली नवीन इमारतीत देतो. मात्र जर हया खोल्यांसाठी स्वतंत्र वीजपुरवठा, स्वतंत्र रेशनकार्ड असेल व त्यानुसार त्याला स्वतंत्र व्हेकेशन नोटीस द्याव्या लागतात व अशा परिस्थितीत स्वतंत्र खोल्या दिल्या जातात.

मा. सदस्य श्री. रमेश परब यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया रहिवाशाकडे १० फूट x १० फूट आकाराच्या दोन स्वतंत्र खोल्या होत्या व त्याबाबतच्या स्वतंत्र भाडेपावत्याही असून

संक्रमण शिबीरातही हया रहिवाशास दोन खोल्या दिल्या आहेत, अशा परिस्थितीत नवीन इमारतीतही हया रहिवाशास दोन जून्या खोल्यांच्या बदल्यात दोन खोल्या देणे आवश्यक वाटते.

सहमुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, एका कुटुंबात राहणा-या व्यक्तींची संख्या ८ पेक्षा जास्त असेल व एकच व्हेकशन नोटीस दिली असली तरी संक्रमण शिबीरात आपण दोन गाळे देतो. हया प्रकरणामध्ये कुटुंबातील रहिवाशांची संख्या ८ पेक्षा जास्त असल्याने संक्रमण शिबीरात दोन गाळे दिले आहेत.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे आदेश दिले की, हया रहिवाशाकडे त्याच्या दोन खोल्यांबाबतची स्वतंत्र विद्युत देयके, रेशनिंग कार्ड व इतर कागदपत्रे आहेत का ? याची छाननी करावी व जर त्याच्याकडे अशी कागदपत्रे असतील तर त्याला दोन खोल्या नवीन इमारतीत देण्याबाबत कार्यवाही करावी. सहमुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत छाननी करुन निर्णय घेण्यात येईल.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, मा. सदस्य श्री. संजय शिर्के यांनी सांगितल्यानुसार जे अनिवासी गाळे विकले जात नाहीत वा रिक्त आहेत त्यांच्या विक्रीबाबत निर्णय घेण्यात यावा. मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकांमध्ये हया विषयावर चर्चा झाली असून असे ठरले होते की, अशा गाळयांची यादी तयार करुन त्यांच्या विक्रीबाबतच्या निविदा मागवाव्यात व प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य हया तत्वावर हे गाळे विकावेत. मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाने कळविलेल्या दराप्रमाणे हे गाळे विकत घेण्यासाठी मंडळाकडे अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे हया अर्जदारांना प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य हया तत्वावर हे गाळे विकावेत.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाकडे जर हयाबाबत अर्ज प्राप्त झाले असतील तर त्याबाबतची नोंद ठेवण्यात यावी व भविष्यात तिस-या व्यक्तीने त्याबाबत हक्क सांगू नये हयाबाबत दक्षता घेण्यात यावी.

मा. सदस्य श्री. मोहन देसाई यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, चिंचपोकळी येथे चिंचपोकळी गणेशोत्सव मंडळ आहे. हयाठिकाणी एक नवीन इमारत मंडळाने बांधलेली आहे. हया गणेशोत्सव मंडळाने हया नवीन इमारतीतील एक गाळा त्यांना मिळण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे. मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, अशाप्रकारे गाळे आपण देऊ शकत नाही. आपण आता केलेल्या धोरणांनुसार नवीन इमारतीतील एक गाळा चाळ कमिटी / सोसायटीला देतो. चाळ कमिटी / सोसायटी जर त्यांचा गाळा सदर गणेशोत्सव मंडळाला देत असेल तर त्यांनी द्यावा.

मा. सदस्य श्री. मोहन देसाई यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीत बरेचसे अनिवासी गाळे रिक्त आहेत त्यामुळे त्यातील एक गाळा देण्याची विनंती सदर गणेशोत्सव

मंडळाने केली आहे. मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्रचित इमारतीमध्ये अनिवासी गाळे रिक्त राहण्याचा प्रश्नच उदभवत नाही व अनिवासी गाळे अतिरिक्त उपलब्ध असतील व बृहतसूचीवर अनिवासी गाळयांची मागणी नसेल तरच आपण असे गाळे देऊ शकतो.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, विकास नियंत्रण नियमावलीतील नियमांनुसार इमारतीभोवती मोकळी जागा सोडावी लागत असल्यामुळे अनिवासी गाळे अतिरिक्त उपलब्ध होत नाहीत. या उलट जून्या सर्व अनिवासी गाळेधारकांना त्यांच्या मुळ जागेवरील इमारतील पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने आपण त्यांच्या जून्या गाळयाच्या क्षेत्रफळापेक्षा कमी क्षेत्रफळाचे गाळे देतो. असे कमी क्षेत्रफळाचे गाळे प्राप्त झालेले अनिवासी गाळेधारक अन्य ठिकाणी अतिरिक्त अनिवासी गाळा देण्याची मागणी करतात व जर अन्य ठिकाणी एखादा अतिरिक्त अनिवासी गाळा उपलब्ध होत असेल तर तो आपण अशा रहिवाशांना देतो. यामुळे अनिवासी गाळे अन्य व्यक्तींना किंवा मंडळांना २ संस्थांना आपण देऊ शकत नाही.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, खेड गल्ली येथे बांधण्यात आलेल्या " सुखशांती " नावाच्या इमारतीमध्ये अशाप्रकारे अनिवासी गाळा देण्यात आलेला आहे. हया इमारतीची इलेक्ट्रिक केबिन पॅसेजमध्ये असून हया इमारतीमध्ये सोसायटीची एक खोली असून इलेक्ट्रिक मिटर सोसायटीच्या खोलीत हलविण्यात आले आहेत. त्यासाठी बी.इ.एस.टी. ने परवानगी दिली आहे. हया इमारतीतील अनिवासी गाळा तळ मजल्यावर असल्याने हया गाळयामध्ये गैरप्रकार चालू असतात व त्याचा रहिवाशांना खूप त्रास होतो. त्यामुळे हा गाळा सदर गणेशोत्सव मंडळास दिल्यास गैरप्रकारांना आळा बसून रहिवाशांना त्रास होणार नाही.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, जर हा अनिवासी गाळा खाली असेल तर तो सदर गणेशोत्सव मंडळास देण्यात यावा तसेच अशाप्रकारचे अतिरिक्त अनिवासी गाळे जर इतर ठिकाणीही उपलब्ध असतील व जर अशा गाळयांची मागणी प्राप्त झाल्यास सदर गाळे संबंधितांस देण्यात यावेत.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ठाकूरव्दार येथे ११७-बी क्रमांकाची इमारत आहे. हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी रहिवाशांना ना.ह.प्र.पत्र दिले आहे. ना.ह.प्र.पत्र ज्या व्यक्तीच्या नावे दिले आहे ती व्यक्ती सदर इमारतीतील रहिवाशी नाही. ना.ह.प्र.पत्र मिळाल्यानंतर ना.ह.प्र.पत्रधारकाने दुरुस्तीसाठी ४ ठेकेदार बदलले. हया इमारतीच्या मालकाने अशी तक्रार केली आहे की, त्याच्या हया इमारतीतील जागेची अद्याप दुरुस्ती केलेली नाही व इमारतीच्या दुरुस्तीचे काम अर्धवट केले आहे. त्यामुळे सदर इमारतमालकाने अशी विनंती केली आहे की, त्याला हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी ना.ह.प्र.पत्र देण्यात यावे जेणेकरुन तो इमारतीची उर्वरित दुरुस्ती करु शकेल.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने अशा सूचना दिल्या की, हयाबाबत छाननी करुन पूर्वीच्या ना.ह.प्र.पत्रधारकास देण्यात आलेले ना.ह.प्र.पत्र रद्द करावे व इमारतमालकाने ७० टक्के रहिवाशांच्या संमतीसह ना.ह.प्र.पत्राची मागणी केली असल्यास त्यांना दुरुस्तीसाठी ना.ह.प्र.पत्र देण्यात यावे. उपमुख्य अभियंता (पुनर्र/उत्तर) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, इमारत मालकाने जर ७० टक्के रहिवाशांच्या संमतीसह प्रस्ताव सादर केला असेल तर ना.ह.प्र.पत्रधारकाचे नाव बदलून दिले जाऊ शकते.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या अर्ध्या भागाची दुरुस्ती झाली असल्याने ७० टक्के रहिवाशी आता संमती देतील किंवा नाही याबाबत साशंकता आहे. उपमुख्य अभियंता (पुनर्र/उत्तर) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ज्या रहिवाशांच्या भागाची दुरुस्ती झाली आहे ते रहिवाशी आता दुरुस्तीसाठी पैसे देणार नाहीत व संमतीही देणार नाहीत. हया परिस्थितीत ७० टक्के रहिवाशांची संमती घेण्याची अट शिथिल करावी लागेल.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे सुचविले की, ज्या रहिवाशांच्या भागाची अद्याप दुरुस्ती झालेली नाही अशा रहिवाशांची तरी संमती घेण्यात यावी जेणेकरुन रहिवाशांच्या मागणीनुसार ना.ह.प्र.पत्रधारक बदलणे शक्य होईल. हयास सर्वानुमते सहमती दर्शविण्यात आली.

मा. सभापती यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, ज्या इमारतींच्या पुनर्रचनेची कामे नुकतीच पूर्ण झालेली आहेत अशा इमारतींचे गाळे/ चावी वाटपाचा कार्यक्रम आचारसंहिता लागू होण्यापूर्वी करणे आवश्यक आहे. मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई यांनी सर्व सदस्यांचीही हीच मागणी असल्याचे प्रतिपादन केले. खेड गल्लीमध्ये काचवाला चाळ तसेच मानाजी राजूजी चाळ हया इमारती पूर्णतः बांधून तयार आहेत. काचवाला चाळीचे गाळे वाटप अद्याप का केले नाही हे कळत नाही. मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ज्या इमारतींची पुनर्रचना हया मंडळाच्या कारकीर्दीत करण्यात आली आहे त्यांच्या गाळे वाटपाचा कार्यक्रम आगामी आचारसंहितेपूर्वी झालाच पाहिजे. अकोला बिल्डिंग, काचवाला बिल्डिंग, पारशीवाडा, पटेल बिल्डिंगचा काही भाग, छत्रीवाला चाळ हया इमारतींच्या पुनर्रचनेची कामे पूर्ण झाली असल्याने गाळे / चावी वाटपाचा कार्यक्रम त्वरित आयोजित करण्यात यावा. पाणी वगैरे सुविधा नंतर प्राप्त होतीलच. परंतु त्याअगोदर इमारतीच्या उदघाटनाचा कार्यक्रम आयोजित करण्यास हरकत नाही.

मा. सदस्य श्री. रमेश परब यांनी तदनंतर अशी विनंती केली की, दि.३/८/२००४ रोजी अंगारकी चतुर्थी असल्याने हया शुभदिवशी त्यांच्या इमारतीसह इतर पुनर्रचित इमारतींच्या उदघाटनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री, उपमुख्य मंत्री, गृहनिर्माण मंत्री यांची वेळ घेऊन दि.३/८/२००४

ते दि.५/८/२००४ रोजी हया कालावधीत इमारतींच्या उदघाटनाचे कार्यक्रम आयोजित करावेत. काही इमारतींबाबत अशीही शक्यता आहे की, रहिवाशांना देकारपत्र दिली नसावीत. लाईटची किंवा पाण्याची सुविधा उपलब्ध झाली नसेल अशा इमारतींचेही उदघाटन मंडळाने आचारसंहितेपूर्वी करावे. मुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असा कार्यक्रम आयोजित करण्यास हरकत नसावी असे सुचविले.

मा. सदस्य श्री. रमेश परब यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, त्यांच्या इमारतीसमोरील जे ८-१० अनिवासी गाळे आहेत त्यांना मागच्या बाजूला स्थलांतरित करण्याचे आदेश जर सहमुख्य अधिकारी यांनी दिले तर हया इमारतीस महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र मिळेल. कार्य.अभि./पु.वि.३ यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, म.न.पा. च्या अटींनुसार हे अनिवासी गाळे सेटबॅक मध्ये येत असल्याने त्याखालील जागा जोपर्यंत म.न.पा. च्या ताब्यात दिली जात नाही तोपर्यंत इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देता येणार नाही.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने पुन्हा असे प्रतिपादन केले की, इमारत बांधून तयार असेल व इतर कारणांमुळे जर भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले नसेल तरी अशा इमारतींच्या उदघाटनाचा कार्यक्रम मंडळातर्फे आयोजित करण्यात यावा व तदनंतर अशा इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही युध्दपातळीवर हाती घेण्यात यावी.

उपमुख्य अभियंता यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया प्रकरणामध्ये म.न.पा. ने तळ मजल्यावरील अनिवासी गाळयांना भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे. त्यामुळे सेटबॅक मधील जागेवर असलेल्या अनिवासी गाळेधारकांना नवीन गाळयांचा ताबा देऊन सेटबॅकची जागा म.न.पा. ला हस्तांतरित केल्यानंतर म.न.पा. उर्वरित संपूर्ण इमारतीसाठी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

सहमुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया अनिवासी गाळेधारकांना गाळयांचे वाटप का.अ./पु.वि.३ यांनी सुचविल्यानुसार प्रोव्हीजनल न करता अंतिम करण्यात यावे. कारण प्रोव्हीजनल वाटप केल्यानंतर न्यायालयीन प्रकरणे उदभवण्याची शक्यता असते. उपमुख्य अभियंता (पुनर्र.)यांनी तदनुषंगाने हया अनिवासी गाळेधारकांना गाळयांचे अंतिम वाटप करण्यास हरकत नसल्याचे प्रतिपादन केले व त्यानुसार सहमुख्य अधिकारी यांनी हया अनिवासी गाळेधारकांना नवीन गाळयांचे अंतिम वाटप करण्याचे मान्य केले. का.अ./पु.वि.३ यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, म.न.पा.ने फक्त हया अनिवासी गाळेधारकांना फक्त स्थलांतरित करण्याची परवानगी दिली असून व्यापारास परवानगी दिलेली नाही तसेच भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही. अशा परिस्थितीत गाळयांचे वाटप अंतिम स्वरुपाचे करता येणार नाही असे वाटते.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने पुन्हा असे आदेश दिले की, सहमुख्य अधिकारी गाळयांचे अंतिम वाटप करण्यास तयार असल्याने गाळयांचे अंतीम वाटप करण्यात यावे. जरी गाळयांचे वाटप प्रोव्हीजनल केले तरी संबंधित अनिवासी गाळेधारक हे इतरांप्रमाणे त्यांचा व्यवसाय सुरु करणारच.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, काचवाला चाळीबाबत वरीलप्रमाणे स्थलांतरणाची अडचण नसल्याने दि. ३.८.२००४ पर्यंत हया इमारतीतील गाळयांचे वाटप केले जाऊ शकते. त्यामुळे हया इमारतीतील गाळयांचे वाटप करण्याची विनंती केली.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत यांनी तदनंतर अशी मागणी केली की, आतापर्यंत ज्या पुनर्विकासाच्या प्रस्तावांना मंडळाच्या मान्यतेने ना हरकत प्रमाणपत्रे प्रदान केली जात आहेत व तदनंतर पुनर्विकासाच्या कामास सुरुवात झालेली नाही अशा सर्व प्रस्तावांची माहिती सद्यःस्थितीसह मंडळाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करावी. मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे आदेश दिले की, हयाबाबतची माहिती मंडळापुढे सादर न करता त्यांना देण्यात यावी.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, त्यांच्या माहितीनुसार उपमुख्य अभियंता / दक्षिण या पदावर कायमस्वरुपी अधिका-याची नेंमणूक झालेली नाही. हया दोन्ही पदांवर कायमस्वरुपी अधिका-यांची नेमणूक त्वरित करण्याबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच चंदनवाडी येथील मंडळाच्या पुनर्रचित इमारतीमध्ये का.अ./सी १-२ विभाग यांचे पूर्वी कार्यालय होते. आता हे कार्यालय रजनी महल येथे हलविण्यात आल्याने त्या विभागातील इमारतीतील रहिवाशांना येण्याजाण्याचा अतिशय त्रास होत आहे. हयाबाबत असे निर्णय कसे घेऊ शकतात हे कळत नाही. प्रभारी उपमुख्य अभियंता / दक्षिण यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हे कार्यालय पुन्हा चंदनवाडी येथील जागेत हलविण्यात आले आहे.

तदनंतर मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी अशी विचारणा केली की, उपकरापोटी म.न.पा.कडून मंडळाला किती रक्कम येणे बाकी आहे. त्यांच्या माहितीनुसार म.न.पा.कडून उपकरापोटी व अंशदानापोटी रु. १३७ कोटी येणे बाकी आहेत. मात्र म.न.पा. आयुक्त यांनी खासदार मा. मिलींद देवरा यांना असे कळविले आहे की, उपकरापोटी व अंशदानापोटी म.न.पा.कडून काहीच रक्कम येणे बाकी नाही. हयाबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे ? अशी विचारणा मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी केली.

मुख्य लेखाधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, म.न.पा. ला मंडळाकडून जी रक्कम देय आहे ती रक्कम त्यांनी मंडळाला द्यावयाच्या उपकरापोटीच्या रक्कमेतून वळती करुन घेतली आहे. उपकरापोटी म.न.पा.कडून अंदाजे रु. ७० कोटी रक्कम मंडळाला येणे बाकी आहे. मात्र तेवढीच रक्कम मंडळाकडून म.न.पा. ला देय असल्याचे दाखवून सदर रक्कम ते मंडळास देण्यास तयार नाहीत.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, म.न.पा.ने उपकरपोटी उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांकडून रु. ७० कोटी जमा केले आहेत जे अद्याप मंडळास दिलेले नाहीत.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, चंदनवाडी येथील सी १-२ विभागाच्या कार्यालयाचा मुद्दा त्यांनी प्राधिकरणाच्या बैठकीत उपस्थित केला होता. त्याचवेळी हे कार्यालय पुन्हा त्याठिकाणीच स्थलांतरित करण्याचे ठरले. मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी तदनुषंगाने सी. विभागातील रहिवाशांतर्फे मा. सभापतींचे आभार मानले व असे प्रतिपादन केले की, असे चुकीच्या प्रकारचे निर्णय ब-याचवेळा घेतले गेले आहेत. अशा चुकीच्या निर्णयामुळे रहिवाशांनी उपकरापोटी जमा केलेल्या रु. १५ लक्ष रक्कमेचे नुकसान हया कार्यालयाचे रुपांतर रेस्ट हाऊसमध्ये करण्यासाठी झालेले आहे जे अतिशय अयोग्य आहे. मंडळातील कार्यालयांची पाहणी केल्यानंतर असे दिसून येईल की, कार्यालयात बसण्यासाठी कर्मचा-यांना टेबल/खुर्च्या नाहीत, शौचालयाची योग्य व्यवस्था नाही, पिण्याच्या पाण्याची सोय नाही. अशा परिस्थितीत हया कर्मचा-यांना काम करताना अडचणी असूनही ते १० ते १२ तास काम करतात.

मा.सदस्य श्री. रमेश परब यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या आजच्या १०० व्या बैठकीत सन्मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी कर्मचारी / अधिका-यांना भ्रमण दूरध्वनी सेवा पुरविण्याबाबत तसेच त्यांच्या कार्यालयात योग्य सुविधा पुरविण्याबाबत जे मद्दे उपस्थित केले त्यातून त्यानी त्यांच्या कर्मचा-यांबद्दलच्या मित्रत्वाच्या भावना व्यक्त केल्या आहेत. हयामुळे मा.सदस्य श्री. रमेश परब यांनी त्यांना सर्वांतर्फे धन्यवाद दिले.

मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, विजयश्री हया पुनर्रचित इमारतीला अद्याप भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही तसेच रहिवाशांना गाळे वाटप केलेले नाही. त्यामुळे हयाबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे अशी विचारणा त्यांनी केली.

सहमुख्य अधिकारी यांनी तदनुंषंगाने असे प्रतिपादन केले की, ४ रहिवाशी सोडून इतर सर्व रहिवाशांना गाळयांचे वाटप केलेले आहे. हया चार रहिवाशांनी अद्याप कागदपत्रांची पूर्तता केलेली नसल्याने त्यांना गाळे वाटप केलेले नाही. मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी तदनुंषंगाने असे प्रतिपादन केले की, जनता दरबारामध्ये हया रहिवाशांनी हा प्रश्न उपस्थित केल्यानंतर त्याबाबत मंडळाच्या बैठकीत चर्चा करुन मार्ग काढला जाईल असे आश्वासन दिलेले आहे. त्यामुळे मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी अशी विनंती केली की, हयाप्रकरणी अधिका-यांनी लक्ष घालून त्वरित कार्यवाही करावी.

मा.सदस्य श्री.बाप्पा सावंत यांनी तदनंतर अशी विचारणा केली की, मंडळातील उप अभियंता श्री. आर. मोहन हयांच्या बदलीबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे ? मुख्य अधिकारी यांनी तदनुंषंगाने असे प्रतिपादन केले की, श्री. आर. मोहन, उप अभियंता यांना सध्या संगणकाचे काम सोपविले आहे. तत्कालिन उपाध्यक्ष / प्रा. यांनी याबाबत असे आदेश दिले आहेत की, श्री. आर. मोहन, उप अभियंता यांना पूर्वीप्रमाणेच सहकार संस्था कक्षाचे काम सोपवावे. त्यामुळे

संगणकाचे काम संपल्यानंतर त्यांना पुन्हा सहकार संस्था कक्षाचे काम सोपविले जाईल. मा.सदस्य श्री.बाप्पा सावंत यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, श्री. आर. मोहन, उप अभियंता यांना सहकार संस्था कक्षाचे काम सोपवू नये. कारण त्यांच्याबाबत रहिवाशांच्या अतिशय तक्रारी आहेत. मंडळाच्या सदस्यांची नावे सांगून ते रहिवाशांची दिशाभूल करतात. त्यामुळे अशा अधिका-याला हे काम सोपवू नये.

कार्य.अभि./पु.वि.२ यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, भंडारी चाळीच्या पुनर्बांधणीबाबत मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांनी बैठक घेतली होती. हया बैठकीत त्यांनी प्रस्तावित इमारतीच्या नकाशांमध्ये बदल करण्याचे आदेश दिले आहेत ज्यामुळे आपण संपूर्ण चटईक्षेत्राचा वापर हया योजनेत करु शकणार नाही. मा.सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ते हयाबाबत मा अध्यक्ष /प्राधिकरण यांच्याशी चर्चा करुन निर्णय देतील.

मा. सभापती हयांनी बैठकीच्या शेवटी सन्मा. सदस्य ,अधिकारी/कर्मचारीवर्गाचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे व मंडळाची पुढील बैठक दि.६/८/२००४ रोजी घेण्यात येईल असे जाहीर केले.

नि.का.अ./ दु. व पु.

मुख्य अधिकारी,मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा. सभापती,मुं.इ.दु.व पु.मंडळ

परिशिष्ट "ब"

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि. २१/५/२००४ रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकिय मंजुरी मिळालेल्या अंदाजपत्रकांची यादी

अ.क्र	विभाग	वर्गवारी	इमारतीचे नांव	दुरुस्ती टप्पा मंडळ/ ना.ह.प्र.	मजले भाडेकरु नि+अनि=एकूण	क्षेत्रफळ चौ.मी. दर चौ.मी.चा खर्च	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम निव्वळ टप्प्याची रक्कम	रु.१०००/-प्रति चौ.मी.मंजुरी करीता प्रस्तावित रक्कम	रु.१०००/-प्रति चौ.मी.जास्त असलेली रक्कम	शेरा
१.	ई	अ	१२१, मौलाना आझाद रोड, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + १ ४ + २ = ६	१५५.५३ ९९९.३७	१५५४३२/- १५५४३२/-	१५५४३२/-	--	मंजूर
२.	-"-	-"-	५१-५३, क्लेअर रोड, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ३ ४४ + ५ = ४९	२३८१.०० ४७३.३५	११२७०४२/- ११२७०४२/-	११२७०४२/-	--	-"-
३.	-"-	ब	३१, डिलिमा स्टोट (कार्पेंटर स्टोट क्र.२), मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + २ १८ + ० = १८	३४१.१५ १०६७.६१	३६४२४२/- ३६४२४२/-	३६४२४२/-	--	-"-
४.	-"-	अ	४४, मस्जीद बिल्डींग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + १ ८ + ० = ८	१७३.६८ ९७९.९२	१६९८४५/- १६९८४५/-	१६९८४५/-	--	-"-
५.	-"-	-"-	४१, कामाठीपुरा, १४वी गल्ली, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ +३+४ (अंशतः) १९ + २ = २१	४८७.७८ ९६२.३७	४६९४२६/- २९११७५/-	२९११७५/-	--	-"-
६.	-"-	-"-	२८९-२८९अ, प्रभू बिल्डींग, रे रोड, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ +३ २१ + ८ = २९	८८६.४० १०३८.००	९२०४७७/- ७२४८३०/-	६९०७५३/-	३४०७७/-	-"-
७.	-"-	-"-	९१, उंद्रीया स्ट्रीट, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ +३ ३ + १ = ४	३३४.१६ १००१.२१	३३४५६४/- २३९२६७/-	२३८८६३/-	४०४/-	-"-
८.	-"-	-"-	१४४-१५२, डिमटिमकर रोड, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ +२ २२+ ९ = ३१	१३२३.०० ११८०.००	१५६११२५/- १४०२३८७/-	१४०२३८७/-	--	-"-
९.	-"-	-"-	४१-अ, डॉकयार्ड रोड, माझगांव, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + १ २२+ ० = २२	४४७.५३ ८६४.५६	३८६९१७/- ३०६०५०/-	३०६०५०/-	--	-"-
१०.	-"-	-"-	७०,कामाठीपुरा, ३री गल्ली, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ +४ २५ + ६ = ३१	७४३.५० १००८.२३	७४९६२१/- ३६८९८०/-	३६२८५९/-	६१२१/-	-"-
११.	-"-	-"-	५४-५६ए, टँक स्ट्रीट, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + ३ ३१ + ४ = ३५	८९८.६१ १००४.४६	९०२६१७/- ३१२७२५/-	३०८७१८/-	४००७/-	-"-

१२.	ई	अ	१६-अ, मॅगझीन स्ट्रीट, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + २ ३८ + १० =४८	१११४.२१ ९५८.७९	१११५०००/- ५८४६३४/-	५८४६३४/-	--	मंजूर
१३.	-"-	-"-	३७-अ, डॉकयार्ड रोड, मुंबई	चौथा टप्पा मंडळ	तळ +१+२ अंशत: २१ + १ = २२	५६०.०० ९९५.८७	५५७६८८/- १३७६८८/-	१३७६८८/-	--	-"-
१४.	-"-	-"-	९ए, एम.ए.रोड, ४४-४८ जेकब सर्कल, ५६६-५८४ हॅन्स रोड, (बापुराव जगताप मार्ग), मुंबई	दु.टप्पा सुधा. मंडळ	तळ + ३ ३७ + १९ =५६	२०६६.९२ १०५१.३६	२१७३०६९/- १६२९६३१/-	१५२३४८२/-	१०६१४१/-	-"-
१५.	फ.ग(द)	अ	४५, श्रीनिवास चाळ कंपाऊंड, शंकरराव नरम पथ, लोअर परळ, मुंबई	पहिला टप्पा ना.ह.प्र.	तळ + ० १३ + १ = १४	१९६.४७ ९१३.६०	१७९४९५/- १७९४९५/-	१७९४९५/-	--	-"-
१६.	-"-	-"-	९१, वरळी कोळीवाडा, वरळी, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + १ ३ + २ = ५	२३२.१५ ९९९.८९	२३२१२५/- २३२१२५/-	२३२१२५/-	--	-"-
१७.	-"-	-"-	अहमद सेलर बिल्डींग क्र.५, सदानंद जाधव मार्ग, नायगांव-दादर, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + २ ४५ + ० = ४५	१४७५.७८ ३८१.०१	५६२३०१/- ५६२३०१/-	५६२३०१/-	--	-"-
१८.	-"-	क	१००-ई, ए.एफ.डी.इमारत, जुनी प्रभादेवी रोड, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + २ ३६ + ० = ३६	११८०.४७ ९५७.६५	११३०४८५/- ११३०४८५/-	११३०४८५/-	--	-"-
१९.	-"-	अ	४७२, अंबीसी, चापावाडी, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + ० ३३ + ९ = ४२	१०१०.०० ९९२.४१	१००२३३७/- ४७०६४७/-	४७०६४७/-	--	-"-
२०.	-"-	क	६७,भजन भुवन, महात्मा ज्योतिबा फुले मार्ग, नायगांव, दादर, मुंबई	दुसरा टप्पा ना.ह.प्र.	तळ + ३ १६ + ५ = २१	११११.४४ १०३३.६२	११४८८१०/- ७५१२८५/-	७२११९५/-	३७३७०/-	-"-
२१.	-"-	-"-	१६६, पुंडलिक भवन, महात्मा फुले मार्ग, नायगांव-दादर, मुंबई	तिसरा टप्पा ना.ह.प्र.	तळ + १ १८ + ७ = २५	१०१९.६० ९७६.४१	९९५५५४/- ३५६४५०/-	३५६४५०/-	--	-"-
२२.	-"-	-"-	७, काशी सदन, खेड गल्ली, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + ३ ३ + ० = ३	२०६.०१ ९९९.०३	२०५८११/- १०७८३४/-	१०७८३४/-	--	-"-
२३.	-"-	अ	अहमद सेलर बिल्डींग क्र.१, सदानंद जाधव मार्ग, नायगांव-दादर, मुंबई	चौथा टप्पा मंडळ	तळ + २ ३० + ८ = ३८	१३७४.१२ ९९९.३८	१३७३२७१/- ३५४४५१/-	३५४४५१/-	--	-"-
२४.	-"-	-"-	२०५, मिठीबाई लक्ष्मीदास बिल्डींग, डॉ.एस.एस.राव रोड, लालबाग, मुंबई	पाचवा टप्पा मंडळ	तळ + ३ ४१ + ८ = ४९	१२६१.५५ ९६८.७७	१२२२१५५/- २०८९५०/-	१०४३९५/-	३१३३४५/-	-"-
२५.	-"-	-"-	आरसीवाल बैठी चाळ क्र.४ व ५, डॉ.बी.ए.रोड, लालबाग, मुंबई	पाचवा टप्पा मंडळ	तळ + ० १० + २ = १२	२०१.६६ ९७६.४०	११६९०२/- १४११९०/-	१४११९०/-	--	-"-

२६.	फ.ग(द)	अ	३८०-३८६, पटेल बिल्डींग, गणपतराव कदम मार्ग, वरळी, मुंबई	पाचवा टप्पा मंडळ	तळ + ३ ७२+१२ = ८४	२३२३.५० १०५९.५४	२४३८६२४/- २०९६५७/-	१४५३३/-	११५१२४/-	मंजूर
२७.	फ.ग(उ)	अ	२१२, शारदा सदन, शिवाजी पार्क रोड क्र.५, दादर, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ३ ६ + ० =६	४१३.११ ८९२.४२	४४०७८०/- ४४०७८०/-	४४०७८०/-	--	-"-
२८.	-"-	क	११०-डी, सितलादेवी मंदिर कंपाऊंड, एल.जे.रोड, माहिम, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ३ ६ + १ = ७	५५६.०३ ८०७.३६	४४८९२०/- ४४८९२०/-	४४८९२०/-	--	-"-
२९.	-"-	अ	२९८-२९८अे, ३००-३००अे, ३०२-३०२अ, जानकी निवास, एन.सी. केळकर मार्ग, दादर,मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + १ (भाग) ८ + १४ = २२	८६०.०० ५१६.६३	४४४३०७/- ४४४३०७/-	४४४३०७/-	--	-"-
३०.	-"-	-"-	११, शैलजा बिल्डींग, शिवाजी पार्क रोड क्र.४, दादर, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ४ १० + ० =१०	८११.५० ९९८.३६	८९८९१८/- ८९८९१८/-	८९८९१८/-	--	-"-
३१.	-"-	ब व क	१५१-अे, मेहता निवास, जैन सोसायटी, सायन, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ३ ९ + ० = ९	६०४.०० ८३९.०२	५०६७७१/- ५०६७७१/-	५०६७७१/-	--	-"-
३२.	-"-	अ, ब,क	७४, अनंत निवास, केळुसकर मार्ग, दादर, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ३ ९ + २ =११	६९५.६५ ९७०.९९	६७४९११/- ६७४९११/-	६७४९११/-	--	-"-
३३.	-"-	अ	१५३, जॉन पीटर हाऊस, एल.जे.रोड, माहिम, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळमजला फक्त ९ + ० = ९	२४९.१९ ९५७.३१	२३८५५३/- २३८५५३/-	२३८५५३/-	--	-"-
३४.	-"-	क	२, अेसियन बिल्डींग, मनमाला टँक रोड, माटुंगा, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ३ ५२ + ० = ५२	१९०६.४१ ५८२.३०	१११०१०५/- १११०१०५/-	१११०१०५/-	--	-"-
३५.	-"-	अ	३५, मुकुंद निवास, सायन रोड, सायन, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ३ ९ + १ =१०	१३८७.०० ५३६.३६	७४३९४४/- ७४३९४४/-	७४३९४४/-	--	-"-
३६.	-"-	-"-	१७, वसंत निवास, के.व्ही.चितळे पथ, दादर, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + १ भाग २ २ + ० = २	३५९.९६ ८२.८२	२९६१८४/- २९६१८४/-	२९६१८४/-	--	-"-
३७.	-"-	-"-	२७अे, २७एफ, श्रध्दा बिल्डींग, गोखले रोड, दादर, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + ४ २४ + ६ = ३०	१३१५.०५ १०२८.६१	१३५२७८९/- १३५२७८९/-	१३१५०५०/-	३७,७३९/-	-"-
३८.	-"-	-"-	६३-६५, सय्यद हाऊस, वीर सावरकर मार्ग, माहिम, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + १+ ३ + ३ = ६	४२६.६२ ९४४.४६	४०२९२९/- ३४९१३१/-	३४९१३१/-	--	-"-
३९.	-"-	-"-	२९, पाठक निवास, व्हिन्सेंट रोड क्र.१,३, दादर, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + २ २४ + १ = २५	७२६.७१ ९०८.१२	६६००१०/- ५८९५४४/-	५८९५४४/-	--	-"-

४०.	फ.ग(उ)	अ	५२, बेल व्ह्यु, एल.जे.रोड, माहिम, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + ३ ८ + ० = ८	६०९.३६ ८७४.६२	५३२९६०/- ४६६०८८/-	४६६०८८/-	--	मंजूर
४१.	-"-	अ व क	३४२, छेडा सदन, चंदावरकर क्रॅास रोड, माटुंगा, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + ३ १३ + ० = १३	६५९.१४ ६१७.१९	४०६८१५/- २९२३४५/-	२९२३४५/-	--	-"-
४२.	-"-	ब	१७-बी, मगनलाल दयाभाई बिल्डींग, एम.सी.जावळे मार्ग, दादर, मुंबई	दुसरा टप्पा ना.ह.प्र.	तळ + ४ ६४ + ० = ६४	२१००.८३ ८६१.१०	१८०९०२५/- १५७०१०१/-	१५७०१०१/-	--	-"-
४३.	-"-	अ	४-४जी, लक्ष्मी व्हिला, मनमाला टँक रोड, माटुंगा, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + २ ३२ + ११ = ४३	१०३१.१९ ९०३.८१	९३२००५/- ५७३६३१/-	५७३६३१/-	--	-"-
४४.	-"-	-"-	२४१, टॉवर बिल्डींग, सेनापती बापट मार्ग, दादर, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + २ ३२ +१७ = ४९	८६४.४४ १४४३.६१	१२४७९१४/- २१३६७९/-	८६४४४०/-	३८३४७४/-	-"-
४५.	-"-	अ	४३-अे, गोरेगांवकर वाडी, एस.के.बोले मार्ग, दादर, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + ३ ४३ + ३ = ४६	२५४७.८४ ५५७.२९	१४१९९०८/- १०१०८१३/-	१०१०८१३/-	--	-"-
४६.	-"-	-"-	७७-७७सी, जेकब मेन्शन, एल.जे.रोड, माहिम, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ +१ भाग २ ३६ + ५ = ४१	१०५७.७६ ९७७.२८	१०३३७३०/- ५५२५४७/-	५५२५४७/-	--	-"-
४७.	-"-	ब व क	३५४, माटुंगा मॅन्शन, भांडारकर मार्ग, माटुंगा, मुंबई	दु.टप्पा सुधा मंडळ	तळ + ३ १५ +१२ = २७	१०७९.४० ९४३.४०	१०१८३००/- ८९२३४०/-	८९२३४०/-	--	-"-
४८.	-"-	अ व ब	४, जाधव भवन, डॉ.डिसिल्व्हा रोड, दादर, मुंबई	दु.टप्पा सुधा मंडळ	तळ + ३ २१ + ७ = २८	१२५७.६५ ९४३.७९	११८६९६८/- ९४१०१०/-	९४१०१०/-	--	-"-
४९.	-"-	अ	१५९-अे, तंबाखुवाला बिल्डींग, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई	ति.टप्पा सुधा मंडळ	तळ + ३ ४४ +१७ = ६१	१७४०.५२ ९१७.५४	१५९७००५/- ७८९५४९/-	७८९५४९/-	--	-"-

मंडळाच्या दिनांक २१/५/२००४ रोजी होणाऱ्या ९९ व्या बैठकीत प्रशासकिय मंजूरी दिलेल्या दक्षिण परिमंडळातील अंदाजपत्रकांची यादी.

अ विभाग

अ.क्र	इमारतीचा तपशिल	दुरूस्तीचा टप्पा मंडळ/नाहप्र	इमारतीचा उपकर क्रमांक	मजल्यांची संख्या भाडेकरुंची संख्या	इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ दुरुस्तीचा दर	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम	निव्वळ टप्प्याची रक्कम	शेरा
१.	इ.क्र. ५२ राजवाडकर स्ट्रीट	पांचवा मंडळ	अ-६७३	तळ + ३ ११ + २= १३	३७१.२८ ११६२.३४	४३१५५२.००	१४६५०३.००	मंजूर
२.	इ.क्र. २८ कालीकत स्ट्रीट	पहिला मंडळ	अ-२६७९	तळ + २ ३ + ९= १२	४०५.०९ ७८१.१०	३१६४१६.००	३१६४१६.००	मंजूर
३.	इ.क्र. २५, २४, अे २४ बी दुसरी व तिसरी पास्ता लेन	चौथा मंडळ	अ-४९७	तळ + ४ ४२ + २= ४४	१०७६.१४ ९९८.३८	१०७४४००.००	५०६१७३.००	मंजूर

ब विभाग

अ.क्र	इमारतीचा तपशिल	दुरूस्तीचा टप्पा मंडळ/नाहप्र	इमारतीचा उपकर क्रमांक	मजल्यांची संख्या भाडेकरुंची संख्या	इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ दुरुस्तीचा दर	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम	निव्वळ टप्प्याची रक्कम	शेरा
४.	इ.क्र. ६५ क्लाईव्ह रोड	तिसरा मंडळ	ब-४९१८ /१	तळ + ३ ३१ + ७= ३८	११०२.८८ ९८९.२०	१०९०९७७.००	२७४४५८.००	मंजूर
५.	इ.क्र. ११ केशवजी रोड	चौथा नाहप्र	ब-११०४	तळ + ४ १७ + ८= २५	९६३.०१ १४८८.२०	१४३३१६०.००	४९२८६०.००	मंजूर
६.	इ.क्र. १०७ केशवजी नाईक	पहिला मंडळ	ब-४२३७	तळ + ५ ५८ + ६= ६४	२४७६.२१ २११.४०	५२३४७६.००	५२३४७६.००	मंजूर
७.	इ.क्र. ९६-९८ सारंग स्ट्रीट	दुसरा मंडळ	ब-१२२	तळ + ५ ४ + ३= ७	६४२.४७ ९८२.८६	६३११४१	५४७४६२.००	मंजूर
८.	इ.क्र. ७१-७१ ब, महमंद अली रोड	पहिला ना.ह.प्र.	ब-८०४/८०५	तळ + ५ ८१ + ९= ९०	२४४२.२७ ३००.०४	७३२७८४.००	७३२७८४.००	मंजूर
९.	इ.क्र. ६०-६२, कांबेकर स्ट्रीट	तिसरा मंडळ	ब-२६४१	तळ + २ ८ + १८= २६	३५१.०० १२८८.४३	४५२२४०.००	२१३२५५.००	मंजूर
१०.	इ.क्र. ९१ सॅम्युअल स्ट्रीट	चौथा मंडळ	ब-३०४०	तळ + ३ ५७ + २०= ७७	२३६३.५० ११६५.८३	२७५५४५९.००	६०२४४७.००	मंजूर

११.	इ.क्र. १५९-१६१ अे बाबुला टँक रोड	तिसरा/सु मंडळ	ब-३६१ -(२)	तळ + ३ ४९ + ११= ६०	१७४७.५४ ११२९.००	११७२९७८.००	१५७६२९०.००	मंजूर
१२.	इ.क्र. ६२-६७, जंजीकर स्ट्रीट	दुसरा मंडळ	ब-२०७८ -(१)	तळ + ४ + १= ५	६०२.०० ९८७.७५	५९४६३१.००	४२२४१७.००	मंजूर
१३.	इ.क्र. ४७-४९ जंजीकर स्ट्रीट/१८-३४ रघुनाथ महाराज मार्ग	तिसरा मंडळ	ब-१५०३	तळ + २ ३० + १०= ४०	८४७.७८ ११२४.९३	९५३७००.००	३१७८६५.००	मंजूर
१४.	इ.क्र. १५५-१५९, झकेरीया मस्जीद स्ट्रीट	चौथा मंडळ	ब-२१३२	तळ + ५ ११ + १= १२	१२२३.६५ १००७.३३	१२३२९४.००	२५४८५७.००	मंजूर
१५.	इ.क्र. १३ धर्मशाळा रोड	तिसरा मंडळ	ब-२५३३/३६	तळ + ३ ३१ + १२= ४३	१५८४.०० ७५०.८१	११८२७०४.००	५०५५०९.००	मंजूर

सी-१/२ विभाग

१६.	इ.क्र. १-३ भंडारवाडा, भंडारी स्ट्रीट	पहिला मंडळ	सी- ७९०१	तळ + २+३भाग ३ + १= ४	३४६.०५ १०२५.६५	३५४९२५.००	३५४९२५.००	मंजूर
१७.	इ.क्र. ८७-९१ धनजी स्ट्रीट	दुसरा मंडळ	सी ६६१-६६२-६६३	तळ + ३ २४ + ७= ३१	९२७.३७ ९७१.८७	९०१२७९.००	५३०१२७.००	मंजूर
१८.	इ.क्र. २६-३० धनजी स्ट्रीट	दुसरा मंडळ	सी ७२०-७२१	तळ + ३+४भाग १९ + ३३= ५२	८३४.०० ४५०.४२	३७५६५०.००	२७९१५२.००	मंजूर
१९.	इ.क्र. १०९-११३ मुंबादेवी स्ट्रीट	तिसरा मंडळ	सी- ७८४	तळ + ४+५भाग १० + ३५= ४५	११६०.६९ १०१०.१८	११७२५०२.००	४२१०२२.००	मंजूर
२०.	इ.क्र. ७३-७५ मिर्झा स्ट्रीट	तिसरा मंडळ	सी ७२०-७२१	तळ + ४+५भाग १ + ७= ८	३९७.९१ १०५१.०९	४१८२४१.००	१७७२८१.००	मंजूर
२१.	इ.क्र. ११९-१२३ डॉ.माहिमतुरा मार्ग	पहिला मंडळ	सी- ७७२१	तळ + ३+४भाग ३७ + ४= ४१	९५५.९१ ५८१०८.००	७४६७०१.००	७४६७०१.००	मंजूर
२२.	इ.क्र. २३-२७ दुर्गादेवी स्ट्रीट	तिसरा मंडळ	सी ७८-९२-९३	तळ + २ ८ + २= १०	१८७.८५ १०१५.४६	१९०७५५.००	१३२२८६.००	मंजूर
२३.	इ.क्र. १५-१९ बनियान स्ट्रीट	पांचवा मंडळ	सी ६२९०-९१	तळ + ३+४ अंशतः २६ + ११= ३७	७२०.४६ ११६६.४०	८४०३५१.००	२१४३५१.००	मंजूर

५२

63

२४.	इ.क्र. ३०-३२ पहिली पठाण स्ट्रीट	पहिला मंडळ	सी ७८५३-५४	तळ + २+३भाग १६ + ५= २१	५५१.०२ ७७४.८९	४२६९८२.००	४२६९८२.००	मंजूर
२५.	इ.क्र. ३०-३२ इब्राहिम रहिमतुलला रोड	चौथा मंडळ	सी-८०९८	तळ + ५+६अंशतः १० + १= ११	६५२.०७ ९८७.५०	६४३९२१.००	२८८७०८.००	मंजूर
२६.	इ.क्र. ६५-७१ संतसेना महाराज मार्ग	तिसरा/सु मंडळ	सी ७६१५-७८९१	तळ + ३ ३६ + १६= ५२	११६४.०० १२०६.०२	१४०३८०३.००	६७४११६.००	मंजूर
२७.	इ.क्र. १६५-१६७-१६९, बापू खोटे स्ट्रीट	दुसरा मंडळ	सी ५९१०	तळ + ३ ३ + १= ४	३९९.९० ९३६.८०	३७३८६८.००	२२७९०३.००	मंजूर
	सी-३/४ विभाग							
२८.	इ.क्र. ११४-११८ कॅव्हेल स्ट्रीट	चौथा मंडळ	सी ज्ञ३७१८-२२	तळ + ४ २२ + १५= ३७	१६८०.८० ९९६.४९	१६७४९०८.००	४९९९६९.००	मंजूर
२९.	इ.क्र. २५-२७ अनंत वाडी	चौथा/सु मंडळ	सी - ४५३३-३५	तळ + ३ ३८ + ८= ४६	१२६२.०० ९९१.३७	१२५१११९.००	७६५३२३.००	मंजूर
३०.	इ.क्र. १९३ दादीशेठ अग्यारी लेन	तिसरा मंडळ	सी- ३९७७-७९	तळ + २ १४ + ९= २३	४०९.४६ ९८८.०८	४०४५८०.००	२५७३०५.००	मंजूर
३१.	इ.क्र. ३-५-७ नवरोजी स्ट्रीट	पहिला/सु मंडळ	सी- २२२९	तळ + ३ ३८ + ४१= ७९	१७२७.०० ९३१.३२	१६०८३९४.००	१६०८३९४.००	मंजूर
३२.	इ.क्र. १९ दुसरी डेंणसवाडी	चौथा मंडळ	सी- ४६५९-४७७९	तळ + २+३अंशतः २ + १०= १२	६५८.९६ ९९५.९४	६५६२८९.००	१६२७१२.००	मंजूर
३३.	इ.क्र. ३०-३०-बी, ट्रेनिटी स्ट्रीट	पहिला मंडळ	सी-२४०६-२४०९-२४१०	तळ + ३ १३ + १२= २५	६८९.१५ ९९९.६९	६८८९३९.००	६८८९३९.००	मंजूर
३४.	इ.क्र. १३-१५, चंप्पा गलली	तिसरा मंडळ	सी -	तळ + ५+६अंशतः १३ + ८= २१	६९६.८६ ६०१.९५	४१९३७३.००	२५९४७१.००	मंजूर
३५.	इ.क्र. ५१-६१, सिताराम पोददार रोड	तिसरा मंडळ	सी ४६४०-४१	तळ + २ १८ + १५= ३३	१०१४.०० ९९५.४५	१००९३९५.००	२४८८९५.००	मंजूर
३६.	इ.क्र. ३९ चौथी मरीन स्ट्रीट	तिसरा मंडळ	सी- २७०६	तळ + ३ ६ + ०= ६	२१२.०८ १५०२.००	३१८५४६.००	१५९४८६.००	मंजूर

डी-१ विभाग

३७.	इ.क्र. ४९-५५-५५ अे तात्या धारपुरे पथ/ ३३ बी मुगभाट लेन	तिसरा/सु मंडळ	डी-६१३-६१६-(१-२)	तळ + २ ५७ + ९= ६६	३०५९.९६ १२१९.३६	२५११८३४.००	१४१७३३४.००	मंजूर
३८.	इ.क्र. १२७ बी खाडीलकर मार्ग	पांचवा मंडळ	डी-७८६ -(१) व ७८७	तळ + २ ११ + २= १३	६९२.८० १२१६.५५	८४२८२३.००	३२५१५५.००	मंजूर
३९.	इ.क्र. १२७ बी सी खाडिलकर मार्ग	तिसरा मंडळ	डी-७८५ -(३)	तळ + २ १४ + ०= १४	४५२.०० १२७६.५०	५७६९७७.००	२९२६०१.००	मंजूर
४०.	इ.क्र. २०७ अे-०७ बी-०९-०९ बी जे. एस. एस. रोड	तिसरा मंडळ	डी-२८१-८२	तळ + ४ ४ + ३= ७	५७३.०० ९७९.९२	५६१४९३.००	२७४९९३.००	मंजूर
४१.	इ.क्र. २१-२१ अे महर्षि कवे रोड	दुसरा/सु मंडळ	डी-१४७३ -(१) व १४७६	तळ + ४ ८ + २३= ३१	३३०२.०० ११०५.११	३६४९०८८.००	२००११२०.००	मंजूर
४२.	इ.क्र. २३-२५ जे. एस. एस. मार्ग	दुसरा मंडळ	डी- ४६१	तळ + ३ ३ + ४= ७	२१४.०४ १२४५.३०	२६६५४४.००	२१७१२०.००	मंजूर
४३.	इ.क्र. ३९ बाणगंगा रोड	चौथा मंडळ	डी-३०८९ -(१)	तळ + २+ बेसमेंट ८ + ०= ८	४५५.७६ ११५९.८५	५२८६१४.००	२४९७४१.००	मंजूर
४४.	इ.क्र. ६ दरबशा लेन	दुसरा मंडळ	डी. ३३२६ -(३)	तळ + ३ ५ + ०= ५	२०३४.१९ ६६८.०६	१३५८९६८.००	६२१२८६.००	मंजूर
४५.	इ.क्र. ९-९ अे. अे. आर. रांगणेकर मार्ग	पहिला/सु मंडळ	डी-२५५५ -(६-इ)	तळ + ४ २० + ०= २०	२४८२.१२ ६२२.७८	१५४५८२०.००	१५४५८२०.००	मंजूर
४६.	इ.क्र. ९-९ अे-९ एडें गांवदेवी रोड	पहिला मंडळ	डी- ८८६८	तळ + ३ ९ + ६= १५	६४४.२९ ५५०.६२	३५४७६२.००	३५४७६२.००	मंजूर

डी-२ विभाग

४७.	इ.क्र. ५३ अे. आर.एस. निमकर मार्ग	पहिला मंडळ	डी-४७१२	तळ + १+ अॅटीक १० + १= ११	११६.२३ १८६२.२७	२१६४५२.००	२१६४५२.००	मंजूर
४८.	इ.क्र. १० उरणवाला स्ट्रीट	दुसरा मंडळ	डी-४९१८ व ४९२६-२७	तळ + ४ १० + ०= १०	७४२.२४ ९९७.४४	७४०३४०.००	५७७४७२.००	मंजूर
४९.	इ.क्र. २३ बी स्लेटर रोड	पहिला मंडळ	डी- ३६८१ -(७ सी)	तळ + ४ २० + ०= २०	१२८३.२३ ३८७.३७	४९७०७२.००	४९७०७२.००	मंजूर

५२

६६

५०.	इ.क्र. २५-२५ वी बालाराम स्ट्रीट	पहिला/सु मंडळ	डी-४३६१	तळ + २ ८ + ७= १५	११६३.१२ १०३०.७२	११९८८६०.००	११९८८६०.००	मंजूर
५१.	इ.क्र. ५-७ खेतवाडी पांचवी गल्ली	तिसरा मंडळ	डी- १९२९	तळ + ३ ११ + ३= १४	५०८.०० १४८२.५०	७५३११२.००	३२२८७२.००	मंजूर
५२.	इ.क्र. ४, डौरजेट स्ट्रीट	पहिला/ पुन्हा सुधारित मंडळ	डी- ३४१४ -(१)	तळ + ३ ४ + ०= ४	६९२.०८ ११९९.७४	८३०३२२.००	८३०३२२.००	मंजूर
५३.	इ.क्र. २७९ जावजी दादाजी	दुसरा मंडळ	डी- ३६९४ -(५)	तळ + ३ ८ + ०= ८	८०८.७२ ९००.२६	७२८०६२.००	३४३७२९.००	मंजूर
५४.	इ.क्र. १४ महिला पटेल लेन	तिसरा मंडळ	डी-४४०५	तळ + ३ ७ + ४= ११	४५७.५८ ७८१.४०	३५७५५५.००	१८४८३२.००	मंजूर
५५.	इ.क्र. ७-७ अे आवाबाई काशिनाथ रोड	पहिला मंडळ	डी-३८१२ -(५)	तळ + ३ २४ + ०= २४	१५९८.४४ ४०७.३७	६५११६५.००	६५११६५.००	मंजूर

५५

६६७अ